पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ५४ ● रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

जुना इतिहास घोकण्यापेक्षा, नवा इतिहास निर्माण करणे गरजेचे आहे.




# भारतात मुस्लिम नकोत म्हणणारा हिंदूच नाही - सरसंघचालक भागवत

## वन वर्ल्ड वन ह्युमॅनिटी : न्यूयॉर्कमधील कार्यक्रमातून मानवतेचा संदेश

वृत्तसंस्था ३० ऑगस्ट

**न्यूर्याक :** भारतात मुस्लिम नसू नयेत, असे जर कोणी हिंदू विचार करत असेल, तर तो व्यक्ती हिंदूच राहू शकत नाही, असे स्पष्ट आणि ठाम वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात केले. 'वन वर्ल्ड वन ह्युमॅनिटी' (एक जग, एक मानवता) या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात बोलताना त्यांनी हिंदुत्वाचा खरा अर्थ सांगत सर्व धर्मांप्रती बंधुभाव आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने सरसंघचालक मोहन भागवत हे सध्या अमेरिका, कॅनडा आणि ब्रिटनच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान न्यूयॉर्कमध्ये आयोजित 'वन वर्ल्ड वन ह्युमॅनिटी' या आंतरधार्मिक परिषदेत त्यांनी जगभरातील विविध धर्मांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. कार्यक्रमात बोलताना मोहन भागवत यांनी अत्यंत नम्रपणे सुरुवात केली. ते म्हणाले, मी मंचावर उपस्थित असलेल्या इतर धार्मिक नेत्यांसारखा कोणताही धर्मगुरू, विद्वान किंवा धार्मिक क्षेत्रातील मोठा अधिकारी नाही. मी एका सामान्य समाजात काम करणारा कार्यकर्ता आहे. मात्र आपल्या भारतीय संस्कृतीची हीच परंपरा आहे की, धर्म किंवा उपासना पद्धती वेगवेगळ्या असू शकतात, पण संपूर्ण मानवता एकच आहे. २०१८ मधील दिल्लीतील एका कार्यक्रमाचा उल्लेख करत भागवत म्हणाले की, त्यावेळी काही मुस्लिम बांधवांनी मला विचारले होते की, तुम्ही हिंदू राष्ट्राची गोष्ट करता, मग आमचे काय होणार? आम्हाला देशातून बाहेर काढणार का? त्यावर मी त्यांना सांगितले होते की, असा विचार करणे हे हिंदुत्व नाहीच. पुढे स्पष्टीकरण देताना सरसंघचालक म्हणाले, जर आपण स्वतःला हिंदू म्हणवून घेत असू, तर सर्व मार्ग एकाच ईश्वराकडे जातात हे मानावेच लागेल. प्रत्येक माणसाचा सन्मान आणि प्रतिष्ठा समान आहे. त्यामुळे भारतात मुस्लिम नकोत असा विचार करणारा माणूस हिंदू असूच शकत नाही.



### टाइम्स स्क्वेअरवर झळकले मोहन भागवत

या कार्यक्रमापूर्वी न्यूयॉर्कमधील प्रसिद्ध 'टाइम्स स्क्वेअर' येथील मोठ्या डिजिटल बिलबोर्डवर मोहन भागवत यांची चित्रे झळकली होती. तिथे 'संकल्प, सौहार्द आणि संवाद' असा संदेश देण्यात आला होता. अमेरिकेतील भारतीय समुदायाने आणि प्रवाशांनी या बिलबोर्डसमोर मोठ्या उत्साहाने फोटो काढले.

### सत्य एकच, मार्ग अनेक

मोहन भागवत यांनी सांगितले की, जगभरात अनेक धर्म आहेत आणि प्रत्येकाच्या परंपरा व पद्धती वेगवेगळ्या आहेत. ईश्वरप्राप्तीसाठी धार्मिक शिस्त पाळणे आवश्यक असते. पण मूळ सत्य हे एकच आहे आणि संपूर्ण मानवता त्याच सत्यातून निर्माण झाली आहे. जर आपण समाजाला सातत्याने योग्य शिक्षण आणि संस्कार दिले नाहीत, तर समाजात गैरसमज पसरून लोक भरकटू शकतात.

## »थोडक्यात

### रोहिणी खडसेंच्या बॅनरवरून राष्ट्रवादीचे चिन्ह अन् प्रोटोकॉल गायब!

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार एकनाथ खडसे यांचा अमृत महोत्सवी सोहळा आज जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे पार पडत आहे. शहरात मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे एकनाथ खडसे यांचे फोटो केंद्रीय मंत्री आणि भाजप नेत्या रक्षा खडसे यांनी पक्षाच्या प्रोटोकॉलसह लावले आहेत, तर त्याच ठिकाणी दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी मात्र पक्षाचा कोणत्याही प्रकारचा उल्लेख न करता शुभेच्छा देणारे बॅनर लावले आहेत.

---

### गणेशोत्सवात पारंपरिक वाद्य असावे - काँग्रेस

**पुणे :** आगामी गणेशोत्सवाचे पार्श्वभूमीवर पुण्यात सुरू असलेल्या डीजे वरून आता काँग्रेसने सुद्धा यामध्ये त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. गणेशोत्सव वैभवशाली आणि पारंपारिक असल्यामुळे या उत्सवात पारंपारिक वाद्यांचा समावेश असावा. डीजेचा उन्माद गणेशोत्सवाला बदनाम करतो आहे त्यामुळे अनेकांचे कानाचे पडदे फाटले आहेत किंवा अनेक आजार काही लोकांना झाले आहेत. काँग्रेस पक्षाची भूमिका आहे की गणेशोत्सव पारंपारिक वाद्य असावीत लाऊड स्पीकर हवा पण डीजे नको अशी माहिती काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली आहे.

---

### नेपाळमधील जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यांमध्ये ८९८ कामगारांची मृत्यूशी झुंज

**काठमांडू :** नेपाळमध्ये आलेल्या पुरामुळे जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यांमध्ये अडकलेल्या कामगारांना वाचवण्यासाठी बचावकार्य तीव्र करण्यात आले आहे. अंदाजे ८९८ कामगार अजूनही अडकले असून, आतापर्यंत ३६१ जणांची सुटका करण्यात आली आहे. त्रिशुली-३ 'अ' जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात सुरू असलेल्या बचावकार्याला काही प्रमाणात यश आले आहे. बोगद्यातील ६-इंची छिद्रातून एका पाईपद्वारे हवा पुरवली जात आहे. आता ते छिद्र मोठे करून मॅनहोल तयार करण्याची तयारी सुरू आहे, जेणेकरून बचाव पथके बोगद्यात प्रवेश करून वाचलेल्यांचा शोध घेऊ शकतील. २६ ऑगस्ट रोजी हिमकडा कोसळून नेपाळमधील भोटेकोशी आणि त्रिशुली नद्यांना अचानक पूर आला होता.

## बनावट गुटखा निर्मिती प्रकरण

# अखेर गौरव शर्माला अटक, कोट्यवधीचा माल जप्त

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**अकोला :** बंदी असलेल्या गुटख्याची बेकायदेशीर निर्मिती आणि पुरवठा प्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. खदान पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपी गौरव अशोक शर्मा याचा सहभाग समोर आल्यानंतर त्याला अखेर अटक करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी गौरव शर्मा हा अकोल्यातील हिंगणा फाटा येथील बलोदे ले-आऊटचा रहिवासी आहे. तपासात तो एमआयडीसी परिसरात बेकायदेशीर गुटखा निर्मितीचे कारखाने चालवत असल्याचे तसेच तयार गुटखा अकोला परिसरात पुरवणे व विकणे यामध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखा आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईत बनावट गुटखा निर्मितीच्या ठिकाणांवर छापे टाकले होते. या कारवाईदरम्यान बंदी असलेला गुटखा, गुटखा बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल, मॅन्युफॅक्चरिंग मशीन, पॅकिंग मशीन आणि इतर साहित्य हस्तगत करण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या मालाची एकूण किंमत सुमारे १ कोटी ७५ लाख रुपये आहे. तपासात आरोपी गौरव शर्माचा या प्रकरणांशी थेट संबंध असल्याचे उघड झाले. एमआयडीसी परिसरात गुटखा तयार करून तो अकोला शहर आणि आसपासच्या भागात पुरवत व विकत असल्याचा पोलिसांचा दावा आहे.

याशिवाय, खदान पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या एका दुसऱ्या प्रकरणात आरोपी गुलशन गुलाणी याला गुटख्याचा साठा उपलब्ध करून देण्यातही गौरव शर्माची भूमिका असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.पोलीस सांगण्यानुसार, गौरव शर्माच्या कारखान्यातून जप्त केलेला काही माल खदान पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात जप्त केलेल्या मालाशी संबंधित असल्याचे आढळले आहे.

# 'समृद्धी' 31 ऑगस्ट ते 7 सप्टेंबरदरम्यान ब्लॉक!

## सिन्नर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंजदरम्यान् बंद

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**मुंबई :** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर प्रवास करण्यासाठी एक महत्त्वाची माहिती प्रशासनाकडून जारी करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गावर आयटीएमएस अंतर्गत सीसीटीव्हीकरीता गॅन्ट्री बसविण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत सिन्नर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज दरम्यान टप्प्याटप्प्याने वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. महामार्ग पोलिसांकडूत प्राप्त परवानगीनुसार ३१ ऑगस्ट, १ सप्टेंबर आणि २ सप्टेंबर रोजी सिन्नर इंटरचेंज ते भरवीर इंटरचेंज दरम्यान दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत मुंबई दिशेने आणि दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नागपूर दिशेने वाहतूक बंद राहील. तसेच ४, ५ आणि ७ सप्टेंबर रोजी भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज दरम्यान दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत मुंबई दिशेने आणि दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नागपूर दिशेने वाहतूक बंद राहील. समृद्धी महामार्गावरील सर्व प्रवाशांना आवाहन करण्यात आले आहे की, वरील कालावधीत प्रवासाचे पुरेसे नियोजन करुन प्रवास करावा असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आल आहे.



### आयटीएमएस म्हणजे काय?

समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंटेलीजेंट ट्रॉफीक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) बसवले जात आहे. यामध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही, वेग मोजणारे कॅमेरे आणि स्वयंचलित चलन प्रणालीचा समावेश आहे. गॅन्ट्री ही या कॅमेऱ्यांना आधार देणारी मोठी लोखंडी संरचना असते, जी महामार्गाच्या एका बाजूने दुसऱ्या बाजूपर्यंत असते. या कामादरम्यान क्रेन आणि मोठ्या यंत्रसामुग्रीचा वापर होणार असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक बंद ठेवणे आवश्यक आहे.

### पहिला टप्पा - सिन्नर ते भरवीर

३१ ऑगस्ट, १ सप्टेंबर आणि २ सप्टेंबर अशा तीन दिवस सिन्नर इंटरचेंज ते भरवीर इंटरचेंज दरम्यान हे काम होणार आहे. या दिवशी दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक बंद राहील, तर दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नागपूरच्या दिशेने जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येईल.

### दुसरा टप्पा - भरवीर ते इगतपुरी

४, ५ आणि ७ सप्टेंबर रोजी भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज या घाट विभागात गॅन्ट्री बसवण्याचे काम होईल. याही दिवशी वेळ तीच असणार आहे. दुपारी १२ ते १ या वेळेत मुंबईकडे जाणारी तर दुपारी ३ ते ४ या वेळेत नागपूरकडे जाणारी वाहतूक थांबवली जाईल. ६ सप्टेंबर रोजी कोणताही ब्लॉक असणार नाही.

# दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार?

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चेला जळगाव जिल्ह्यात रविवारी नवी दिशा मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार एकनाथ खडसे यांच्या कोथळी (ता. मुक्ताईनगर) येथील अमृत महोत्सवी सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे रविवारी सकाळी जळगाव विमानतळावर आगमन झाले.

यावेळी त्यांच्या स्वागतासाठी शरद पवार गटासोबतच अजित पवार गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे एकनाथ खडसे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांच्या जळगाव विमानतळावरील आगमनाच्या वेळी एक वेगळेच चित्र पाहायला मिळाले. यावेळी दोन्ही गटांच्या जिल्हाध्यक्षांनी शरद पवार यांचे स्वागत केले .

# जोपर्यंत कुणबी प्रमाणपत्र मिळत नाहीत, तोपर्यंत इथे यायचं नाही!

## जरांगे शिंदेंवर संतापले, शिवसेनेच्या नेत्यावरही टीका

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अंतरवाली सराटी :** मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे आणि हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या नेत्यांवर तुफान टीका केली. एरवी एकनाथ शिंदे यांच्याविषयी आदराने बोलणाऱ्या मनोज जरांगे यांनी एकनाथ शिंदे यांच्या परभणीतील कार्यक्रमाला विरोध केला. जोपर्यंत कुणबी प्रमाणपत्र मिळत नाहीत, तोपर्यंत इथे यायचं नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी ठणकावून सांगितले.

संजय शिरसाट आणि बंडू जाधव हे दोघे मुद्दाम परभणीत एकनाथ शिंदे यांचा कार्यक्रम घेत आहेत. पण एकनाथ शिंदे यांना सांगावं, तुमचा कार्यक्रम होणार नाही. कार्यक्रम रद्द करा. मी तिकडे आलो तर मोठी पंचाईत होईल. पुन्हा राज्य अस्थिर होईल. मग तुमच्यावर खापर फुटेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मनोज जरांगे म्हणाले, एकनाथ शिंदेंची पोरं मोठी झालीत. कधी रिक्षा चालवतो म्हणतो, कधी बैलगाडी चालवतो म्हणतो. त्या बंड्याने (खासदार बंडू जाधव) एकनाथ शिंदेंना परभणीत बोलावले असेल. त्याला माज आला असेल, त्याला माहिति नसेल त्याच्यासाठी मी काय केलं आहे.

# ओबीसींच्या 1 सप्टेंबरच्या आंदोलनाला परवानगी नाकारली!

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**मुंबई :** ओबीसी समाजाच्या वतीने १ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानात प्रस्तावित करण्यात आलेल्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आंदोलनासाठी मल्लिकार्जुन पुजारी यांच्या नावाने पोलिसांकडे अर्ज करण्यात आला होता. मात्र, आझाद मैदान पोलिसांनी विविध कारणे नमूद करत आंदोलनास परवानगी देण्यास नकार दिला आहे. मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत दाखल झाल्यास आझाद मैदान परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तसेच परिसरातील रुग्णालयांच्या कामकाजावर आणि आपत्कालीन सेवांवरही गर्दीचा परिणाम होऊ शकतो, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. आंदोलनामुळे आझाद मैदान परिसरात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना होणारा संभाव्य त्रास, वाहतुकीवरील परिणाम आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन परवानगी नाकारण्यात आल्याचे समोर आले आहे.'मनोज जरांगे यांचे आंदोलन मराठा समाजातील गरिबांसाठी नसून, सत्तेतील आजी-माजी आमदार आणि मंत्र्यांची बोगस कुणबी प्रमाणपत्रे वैध करून घेण्यासाठी आहे. 'कुणबीचा दाखला म्हणजेच मागासवर्गीय' हा शासनाचा बेकायदेशीर जीआर ओबीसींच्या आरक्षणात माती कालवणार असून महाराष्ट्रातील ओबीसींचे आरक्षण आता संपले आहे,' असा गंभीर आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे. १ सप्टेंबर रोजी ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी दौंड येथून मुंबईकडे 'संघर्ष यात्रा' काढणार असून या दिवशी मुंबई आणि पुणे ठप्प करू, असा इशाराही त्यांनी दिला.








## आपल्या जीभेचे रंग आणि आरोग्य.....

अनेकदा आपण डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर आपल्याला जीभ दाखवायला सांगतात. जीभ पाहून डॉक्टरांना आजाराचं निदान कसं काय होत असेल? तर जाणून घेऊया की, डॉक्टर जीभ का बघतात? जीभेचा रंग हा शरिराच्या स्थितीचा अंदाज सांगतो.

जीभेच्या रंगामागचं खरं कारण जाणून घेऊया...

१) गुलाबी रंग... : गुलाबी रंगाची जीभेवर जर कोणत्याही प्रकारचे डाग नसतील तर तुम्ही पूर्णपणे व्यवस्थित आहात.

२) सफेद रंग...: जर जीभेवर सफेद रंगाचा थर असेल तर पचन क्रिया व्यवस्थित नाही. तुमच्यात अशक्तपणा आहे. काही वेळेस हे वायरल इन्फेक्शनचा प्रकार असू शकतो.

३) पिवळा रंग...: पिवळा रंग सांगतो की सर्दी, वायरल इंफेक्शन किंवा शरिरात हिट वाढली आहे. काही वेळेस हा पचन न होण्याच्या समस्येचंही संकेत देतो.

# दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटाएवढा ऊर्जा असलेला धूमकेतू 'हॉवर्ड–कुमेन–मायकेल्स'!

सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्ब स्फोटांएवढा ऊर्जेचा हॉवर्ड–कुमेन–मायकेल्स हा धूमकेतू १९७९ साली सूर्याच्या पृष्ठभागावर आदळला. असा धूमकेतू आदळण्याची ही मानवी इतिहासातील पहिली नोंद आहे.

हॉवर्ड – कुमेन – मायकेल्स हा खगोलशास्त्राच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा धूमकेतू आहे. ३० ऑगस्ट १९७९ रोजी हा धूमकेतू थेट सूर्याच्या पृष्ठभागावर जाऊन आदळला. मानवी इतिहासामध्ये एखाद्या धूमकेतूची सूर्याशी अशा प्रकारे थेट टक्कर झाल्याची आणि ती कॅमेऱ्यात कैद झाल्याची ही पहिलीच नोंद मानली जाते. जेव्हा हा धूमकेतू सूर्यावर आदळला, तेव्हा त्यातून निर्माण झालेली ऊर्जा ही सुमारे १० लाख (१ मिलियन) हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी प्रचंड होती. हा धूमकेतू 'क्रीटझ सनग्रेझर' या समूहाचा भाग होता. हे असे धूमकेतू असतात जे सूर्याच्या अतिशय जवळून प्रवास करतात. बहुतेक धूमकेतू सूर्याजवळ पोहोचण्यापूर्वीच त्याच्या उष्णतेने वितळून नष्ट होतात, परंतु याची थेट टक्कर नोंदवली गेली.

शोध आणि नावया धूमकेतूचा शोध अमेरिकेच्या नौदल संशोधन प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ आर. हॉवर्ड, एम. कुमेन आणि डी. मायकेल्स यांनी 'सोलविंड' या उपग्रहावरील कोरोनाग्राफच्या मदतीने लावला होता. म्हणूनच त्यांच्या सन्मानार्थ या धूमकेतूला 'हॉवर्ड–कुमेन–मायकेल्स' असे नाव देण्यात आले. खगोलशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांसाठी आणि अंतराळातील महत्त्वाच्या घटनांमध्ये या घटनेला विशेष स्थान आहे.

हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स धूमकेतूचा शोध ही खगोलशास्त्राच्या इतिहासातील एक अनोखी आणि अनपेक्षित घटना होती.सॅटेलाइटद्वारे लागलेला पहिला शोध : ३० ऑगस्ट १९७९ रोजी हा धूमकेतू सूर्यावर आदळला. परंतु, त्यावेळी पृथ्वीवरील कोणत्याही दुर्बिणीतून तो दिसला नव्हता. या घटनेच्या काही महिन्यांनंतर, जेव्हा शास्त्रज्ञ उपग्रहाच्या डेटाचा अभ्यास




करत होते, तेव्हा त्यांना हा धूमकेतू सापडला. अंतराळातील उपग्रहाने शोधलेला हा जगातील पहिला धूमकेतू ठरला. अमेरिकेच्या नौदल संशोधन प्रयोगशाळेने 'पी७८-१' या उपग्रहावर 'सोलविंड' नावाचा एक विशेष कोरोनाग्राफ बसवला होता. कोरोनाग्राफ हे असे उपकरण असते जे सूर्याची प्रखर चकती झाकून त्याच्याभोवतीचे बाह्य वातावरण पाहण्यास मदत करते. शास्त्रज्ञ आर. हॉवर्ड, एम. कुमेन आणि डी. मायकेल्स हे सूर्याच्या वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी 'सोलविंड'ने पाठवलेले फोटो तपासत होते. अचानक त्यांना फोटोंमध्ये एक पांढरी चमकदार रेघ सूर्याच्या दिशेने सरकताना दिसली. सुरुवातीला त्यांना वाटले की हा कॅमेऱ्यातील अंतर्गत प्रकाश परावर्तनाचा दोष असावा. परंतु, सखोल तपासणीअंती तो एक प्रचंड वेगाने जाणारा धूमकेतू असल्याचे स्पष्ट झाले. सुरुवातीला या धूमकेतूला शोधकर्त्यांच्या नावावरून 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' म्हटले गेले. परंतु नंतर आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रीय संघाने नियम बदलले आणि सॅटेलाइटद्वारे शोधल्या गेलेल्या धूमकेतूंना उपग्रहाचे नाव देण्याचे ठरवले. त्यामुळे आता याचे अधिकृत नाव सी/१९७९क्यू१ (सोलविंड१) असे आहे. क्रीटझ सनग्रेझर धूमकेतू समूह हा धूमकेतू ज्या समूहाचा भाग होता, त्याला खगोलशास्त्रात 'क्रीटझ सनग्रेझर' म्हणतात. 'सनग्रेझर' म्हणजे असे धूमकेतू जे आपल्या लंबगोलाकार कक्षेत फिरताना सूर्याच्या अत्यंत जवळून (काही हजार किलोमीटरवरून) प्रवास करतात. शास्त्रज्ञांच्या मते, हजारो वर्षांपूर्वी अंतराळात एक प्रचंड मोठा महा-धूमकेतू अस्तित्वात होता. सूर्याच्या जवळ आल्यावर त्याच्या अतिप्रचंड गुरुत्वाकर्षणामुळे आणि उष्णतेमुळे त्या महा-धूमकेतूचे तुकडे झाले. हे तुकडे म्हणजेच आजचे क्रीटझ सनग्रेझर धूमकेतू आहेत. इतिहासत इसवी सन पूर्व ३७१ मध्ये ॲरिस्टॉटलने पाहिलेला धूमकेतू हाच या सर्वांचा मूळ जनक असावा, असा अंदाज आहे. १९ व्या शतकात हाइनरिख क्रीटझ या जर्मन शास्त्रज्ञाने या सर्व धूमकेतूंच्या कक्षेचा सखोल अभ्यास केला. त्यांनी सिद्ध केले की या सर्व धूमकेतूंचा मार्ग एकच आहे आणि ते एकाच मोठ्या धूमकेतूचे तुकडे आहेत. म्हणूनच त्यांच्या सन्मानार्थ या समूहाला 'क्रीटझ' नाव देण्यात आले. या समूहातील हजारो लहान-मोठे तुकडे अजूनही सूर्याभोवती फिरत आहेत. एनएएसए आणि ईएसएच्या एसओएचओ उपग्रहाने आतापर्यंत अशा ५,००० पेक्षा जास्त लहान क्रीटझ धूमकेतूंचा शोध लावला आहे, जे रोज सूर्याच्या वातावरणात जाऊन नष्ट होत असतात.

## पावसाळ्यातील आहार विहार

जेष्ठ- वैशाखातल्या उन्हाच्या तडाख्यामुळे, सगळेच ज्याची आतुरतेने वाट पाहतात तो हिरवा-बरवा ऋतू म्हणजे वर्षा ऋतु! आषाढाची संततधार सुरू झाली की हवेत थोडा गारवा येतो, सृष्टी हिरवीगार होते. पहिल्या पावसात भिजण्याची मजा लुटून झाली, की नंतर मात्र दिसतो जिकडेतिकडे चिखल, घाण दमट झालेली हवा ,दूषित पाणी. त्यामुळे पावसाळ्यात सर्व डॉक्टर -वैद्य मंडळींची मात्र, अगदी चलती असते.

लोकांनी निरोगी राहावे म्हणून आयुर्वेदाने ऋतुचर्या या विषयाला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. वसंत ,ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर असे सहा ऋतू सामान्यपणे सांगितलेले आहेत. पण आपल्या भारताच्या दक्षिण भागात पाऊस जास्त, म्हणून शिशिर हा थंडीचा ऋतू वगळूनप्रावृट (आषाढ-श्रावण) व वर्षा (भाद्रपद ,अश्विन) असे पावसाळ्याचे दोन ऋतू सांगितले आहेत.

**पावसाळ्यातील ऋतुचर्या**

आयुर्वेदाने मानवी शरीराला या विश्वाचीच छोटी प्रतिकृती मानले आहे, त्यामुळे प्रत्येक ऋतूत बाह्य वातावरणात जसे बदल होतात ,तसेच मानवी शरीरातही बदल घडत असतात. या बदलांशी जर आपण जुळवून घेतले, तर आपल्याला आपले आरोग्य टिकवून ठेवता येते. म्हणूनच आयुर्वेदशास्त्राने विशिष्ट ऋतूला अनुकूल असा विशिष्ट आहार -विहार सुचवला आहे त्यालाच ऋतुचर्या असे म्हणतात विशेष म्हणजे आपल्या वेगवेगळ्या सण ,उत्सव परंपरा यांच्या माध्यमातून आरोग्य रक्षण करण्याचा उत्तम प्रयत्न, आपल्या पूर्वजांनी केलेला दिसतो .

वर्षाऋतूत हवेतला दमटपणा आणि ओलावा वाढलेला असतो, त्यामुळे पचनशक्ती (अग्नी) मंद झालेली असते. शरीरात *प्रामुख्याने वातदोष वाढलेला असतो, त्याचबरोबर पित्त-कफदोषही बिघडलेले असतात. अशा काळात पचायला हलके, गरम , भाजलेले अन्न घेण्याची आवश्यकता असते .जसे भाकरी,फुलका,लाह्या,भाजून घेतलेल्या तांदळाचा भात इ. या काळात आपल्याकडे



'चातुर्मास' पाळण्याची प्रथा आहे. वेगवेगळ्या व्रतांच्या रूपाने उपवास केले जातात. काही उपवासात फक्त भाजलेली धान्य, तर काहीत फक्त उकळलेले पाणी पितात. निर्जला एकादशी सारखे उपास पाणीही न पिता केले जातात .वर्षा ऋतूत शरीरात ओलाव्याचे प्रमाण वाढते, त्यामुळे पाण्याची गरज कमी झालेली असते. त्यामुळे वर्षा ऋतुच्या संपूर्ण कालावधीतच पाणी अगदी आवश्यक तेवढे, मोजून मापुनच प्यावे. उन्हाळ्यात पाण्याचे सर्व स्रोत आटल्यामुळे व पावसाळ्यात पाण्यामध्ये गाळ वाहून आल्यामुळे , या काळात पाणी दूषित झालेले असते. या दूषित पाण्यामुळे जुलाब, जंत, कृमी याचा प्रादुर्भाव खूप वाढतो. म्हणूनच वर्षा ऋतूमध्ये 'तप्तशीत' म्हणजेच तापवून थंड केलेले किंवा 'अर्धावशिष्ट' उकळून अर्धे केलेले किंवा 'सिद्ध जल' सुंठ, ओवा, धणे इत्यादी औषधे घालून उकळलेले पाणी अल्प प्रमाणात प्यावे.त्यामुळे जंत कृमी ,आवेचा प्रतिबंध होतो व पचनशक्ती चांगली राहते. वर्षाऋतुत होणाऱ्या रोगांचा प्रतिकार करण्यासाठी आवश्यक औषधेही ,निसर्ग स्वतःहून या काळात निर्माण करतो. या दिवसात भाजीबाजारात नीट डोकावून पाहिल्यास कोकणात कुडा, भारंगी, टाकळा, शेवाळे,फोडशी तर घाटावरती तांदुळजा ,घोळ अशा अनेक रानभाज्या मिळतात. या रानभाज्या कडू असल्या, तरी त्यातील पाणी न काढता शिजवल्यास कृमी, जंत ,जुलाब यावर उत्तम औषध म्हणून त्या काम करतात.

कुडा हे तर आयुर्वेदातील परम औषध! कुड्याच्या शेंगा आणि फुलांची भाजी उत्तम कृमिनाशक आहे. ज्यांच्या घरात आजी असेल तिथे कुड्याचे पाळ ( मूळ) नक्कीच सापडेल. उन्हाळ्या लागणे, बारीक ताप ,कृमी, जुलाब या पावसाळ्यामधील, वात वाढल्यामुळे होणाऱ्या विकारांवर, कुडा हे उत्तम औषध आहे. कुटज घनवटी या त्याच्या गोळ्या बाजारामध्ये उपलब्ध आहेत, पण अर्थातच त्या आपल्या वैद्याच्या सल्ल्याने घ्याव्यात. एकदा पाऊस पडला की उन्हाळ्यात चवदार लागणारी आंबा, फणस, जांभूळ ही फळे बेचव लागतात व झाडावरून गळून पडतात. पावसाळ्यात खाल्ल्यास त्यात किडी पडलेल्या असतात .म्हणूनच पाऊस पडल्यावर ही फळे खाणे बंद करण्याची पद्धत अनेक घरात आहे व ती योग्यही आहे. अट्टाहासाने बाराही महिने सर्व फळे खाणे, हे आरोग्यदृष्ट्या योग्य नाही. पावसाळ्यात खाण्यायोग्य फळ म्हणजे अननस मिरपूड लावून ,सकाळच्या नाश्त्याच्यावेळेस अननस खावा, त्यामुळे पचनशक्ती वाढते व जंत आणि कृमी साठी सुद्धा ते स्वादिष्ट आणि गोड असे औषध आहे. पावसाळा म्हटला की गार हवेमुळे काहीतरी चमचमीत गरमा-गरम खावेसे वाटते. अशा वेळेस भजी -वडे खाल्ले जातात आणि तेही रस्त्यावरचे! आधीच मंद झालेली पचनशक्ती त्यात अशा पदार्थांमुळे आणखीन मंद होते. मग ताप, जुलाब, दमा ,खोकला अशा आजारांना आयतंच निमंत्रण मिळतं .आपल्याकडे एक म्हण आहे आषाढ तळायचा, श्रावण भाजायचा आणि भाद्रपद उकडायचा आषाढात होणारा वातप्रकोप शांत करण्यासाठी थोडे तळलेले जरूर खावे, पण ते घरी केलेले असावे. वडे -भजी यापेक्षा तांदुळाच्या व साबुदाण्याच्या पापड्या, कुरडया असे पदार्थ तळून खाण्यास हरकत नाही. भाजलेल्या गरम गरम भुईमुगाच्या शेंगा ही या काळात खायला उत्तम. पांढरी गावठी मक्याची कणसे भाजून मीठ,तेल,तिखट ,लिंबू लावून खाल्ल्यास तर परमानंदचं ! ग्रीष्मात वातदोषाचा संचय होतो व वर्षाऋतुत वाताचा प्रकोप होतो . त्यामुळे पोटात गुडगुड होणे ,पोट फुगी, दमा, संधिवात असे वाताचे आजार जोर धरू लागतात. कांदा, बटाटा, वांगे,फ्लॉवर, हरभरा,चणा, असे वातुळ पदार्थ म्हणूनच या काळात खाऊ नये.कांदेनवमी झाल्यावर चार महिने हे वातूळ पदार्थ बंद करण्याची व चातुर्मास पाळण्याची प्रथा आपल्याकडे आहे व ती अत्यंत आरोग्यदायी आहे. लसुण तामसी गुण वाढू नये म्हणून चातुर्मासात निषिद्ध असला ,तरी उत्तम वातनाशक असल्यामुळे माफक प्रमाणात लसूण वापरायला हरकत नाही. लसणाच्या तेलाचा उपयोग वैद्यांच्या सल्ल्याने दुखऱ्या कानात घालण्यासाठी किंवा दुखऱ्या सांध्यांना चोळण्यासाठी किंवा दम लागल्यावर छातीला लावण्यासाठी अवश्य करावा.

मंद झालेली पचनशक्ती हळूहळू वाढवायची आहे, म्हणून या काळात फोडणीमध्ये मोहरी, हिंग, मेथी अशा अग्निवर्धक पदार्थांचा सढळ वापर करावा. खाद्यपदार्थात पोट दुखी आणि वात कमी करणारा ओवा जरूर वापरावा. छातीत कफ साठला किंवा सर्दी-पडसे, दुखणारे सांधे यात ओव्याच्या पुरचुंडीने शेक केल्यानेही छान उपयोग होतो. पावसात भिजून होणारी सर्दी, जुलाब पोटदुखी यावर ते आणखीन रामबाण औषध म्हणजे सुंठ सुंठ पावडर, गूळ आणि तूप एकत्र करून छोट्या बोराएवढ्या गोळ्या कराव्यात. घरातील प्रत्येकाला सकाळी उठल्यावर रोज ही आरोग्यरक्षक सुंठ गोळी वर्षा ऋतु अवश्य खायला द्यावी. अशा तऱ्हेने वर्षाऋतूतील या वातावरणाचा विचार करता भाजून घेतलेले धान्य,ताजे गरम घरचे अन्न, उकळून आटवलेल्या पाण्याचा माफक प्रमाणात वापर हे सूत्र आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे !

## आचार्य अत्रे यांनी 'कवींचे कवी' असे गौरव केलेले कवी बी!

### नारायण मुरलीधर गुप्ते यांचा आज स्मृतिदिन

नारायण मुरलीधर गुप्ते उर्फ कवी बी हे श्रेष्ठ कवी होते. त्यांचा जन्म १ जून १८७२ रोजी बुलढाणामधील मलकापूर या ठिकाणी झाला. त्यांचे शालेय शिक्षण यवतमाळ व अमरावती येथे झाले. परिस्थितीमुळे त्यात खंड पडल्याने ते मॅट्रिकही होऊ शकले नाहीत. नंतर सरकारी नोकरी धरली.

कवी बी हे नामाभिधान धारण करून नारायण मुरलीधर गुप्ते यांनी आपल्या अमृतमधुर गुंजारवाने मराठीचिये नगरी मधील विचाराचे व कल्पनेचे कुंज काही काळ निनादवून सोडले व तेथील रसिक रहिवाशांवर आपल्या गीतमाधुर्याची जबरदस्त मोहिनी घातली. खरे सांगायचे म्हणजे 'बी' हे कवींचे कवि आहेत. अनेक कवींना स्फूर्ति पुरविण्याइतके चैतन्य व तेज त्यांच्या कवितेत काठोकाठ भरलेले आहे. त्यांच्या कवितांची शैली ही अतिशय बांधेसूद आणि मधुर आहे. दीर्घकविता हे कवी 'बीं'च्या लेखन शैलीचे वैशिष्ट्ये. त्यांच्या प्रणयपत्रिका, बकुल, माझी कन्या, चाफा, वेडगाणे या काही विशेष उल्लेख कराव्या अश्या कविता! यातील 'माझी कन्या' ही कविता पूर्वी बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना अभ्यासाला असल्यामुळे आणि 'चाफा' ही कविता लता मंगेशकरांच्या समधुर स्वरात गीतबद्ध झाल्यामुळे सर्वोपरीचीत आहे. त्यांनी पहिली कविता 'प्रणय पत्रिका' ही चिखलदरा येथे लिहिली. त्यावेळी ते सुमारे १९ वर्षांचे असावेत. ही कविता त्याच वर्षी कै. हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणूक' पत्रात प्रसिद्ध झाली. अनेक दिवस झाले तरी प्रियकराचे कुशल सांगणारे पत्र आले नाही म्हणून चिंताग्रस्त अश्या प्रेयसीचे आपल्या प्रियकराला लिहिलेले पत्र म्हणजे 'प्रणय पत्रिका. १९११ साली 'बी' हे अभिनव नाव धारण करून त्यांनी 'टला-ट रीला-री । जन म्हणे काव्य करणारी ।' ही 'वेडगाणे' नावाची एक अत्यंत नादमधुर व तात्त्विक कविता 'मासिक मनोरंजनात'त प्रसिद्ध केली. केवळ यमकाला यमक जुळवून अर्थहीन काव्य करण्यावर उपहासात्मक आणि तात्त्विक अशी ही कविता म्हणजे बींच्या प्रतिभेचे एक उत्तम उदाहरण. परंतू ही अतिशय अर्थपूर्ण कविता रचताना स्वतः कवी बी मात्र यमक जुळविल्याशिवाय रहात नाहीत. पण हे सारे साधताना कवितेचे सौंदर्य देखील त्यांनी ढळू दिले नाही. १९११ ते १९३३ पर्यंत, म्हणजे सुमारे एक तपभरच 'बी' कवींची प्रतिभा फुलून आली असे म्हणता येईल.

विदर्भातील जन्म अन् वास्तव्य आणि प्रसिद्धी परांगमुख स्वभावामुळे कवी बी मराठी जगताला अपरिचित राहिले. तशी बी ची कविता वाचून त्या कवितेने प्रभावित होऊन रे ना वा टिळकांनी 'टू बी' ही कविता लिहिली होती. पण बींचे खरे नाव त्यास ही ठाऊक नसावे. पुढे एका रसिकाने कवीला तुमचे खरे नाव सांगा म्हणून आग्रह धरला तेंव्हा या प्रसिद्धी नाकारणाऱ्या कविने 'नांवांत काय आहे?' नावाची कविता लिहीत, नावात न गुंतता काव्य कुसुमाचा आनंद लुटण्याचा अलौकिक सल्ला दिला होता. १९३८ साली आचार्य अत्र्यांनी कवीच्या फुलांची ओंजळ या कविता संग्रहाला प्रस्तावना लिहून कवीची महती मराठी सारस्वतासमोर ठळकपणे मांडली.

'प्रणयपत्रिका' ही 'बीं'ची पहिली कविता १८९१ ची पण १९११ मध्ये लिहिलेल्या 'वेडगाणे' या कवितेपासून त्यांनी 'बी' हे टोपणनाव घेतले. 'फुलांची ओंजळ' हा त्यांच्या ३८ कवितांचा संग्रह असून प्रस्तावना आचार्य अत्र्यांची आहे. 'पिकले पान' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह. त्यात ११ कविता होत्या. कवी बी यांनी एकूण ४९ कविता लिहिल्या. 'फुलांची ओंजळ'ची दुसरी आवृत्ती सप्टेंबर १९४७ मध्ये प्रसिद्ध झाली.

केशवसुतांचा 'बीं' वरील प्रभाव विविध तऱ्हांनी जाणवतो. एक तऱ्हा म्हणजे 'डंका', 'आम्ही', 'भगवा झेंडा' इत्यादी कवितांतील जुने नष्ट करण्याची चेतना देणाऱ्या बंडखोर विचाराची दुसरी 'वेडगाणे,' 'पिंगा', 'चाफा' यांसारख्या अलौकिकाचा ध्यास व्यक्त करणाऱ्या गूढ कवितांची तिसरी, ज्यांत 'आनंदाला म्लानपणानच सौंदर्याला क्षय' अशा पूर्णाकडे जग जाणार असल्याचा निर्भर आशावाद उच्चारणाऱ्या 'फुलांची ओंजळ' सारख्या कवितांची. सौंदर्यानंदाची तीच आस आणि 'सान्त अनन्ताची मिळणी' झाल्याचा उत्फुल्ल क्षणी होणारा साक्षात्कार, 'बीं'चे बालकवींशी साधर्म्य दाखवतो.

'विचार-तरंगां'मध्ये वारंवार बालकवींच्या 'फुलराणी'चा भास होतो. 'कमळा' ही कथन-कविता गोविंदाग्रजांच्या इतिहासविषयक स्वच्छंदतावादी वृत्तीची आणि मधूनमधून त्यांच्या शाहिरी थाटाच्या शब्दकळेची आठवण जागी करते. 'बीं' नी काव्यासंबंधीची आपली मते 'कविवंदन', 'विचारतरंग,' यांसारख्या कवितांत ठामपणे व्यक्त केली आहेत. कवी बी हे केशवसूत, भा. रा. तांबे व चंद्रशेखर यांना समकालीन होते. समकालीन असताना ही त्यांनी स्वत: च्या कवितेचे वेगळेपण राखले. नुसतेच वेगळेपण राखले नाही तर कवितेला सर्वोच्च कलागुणांनी मंडीत केले. बींनी ७५ वर्षाच्या आयुष्यात केवळ ४९ कविता लिहिल्यात. म्हणजे खूपच कमी. पण त्यांचे मोल हस्तीदंतावरील बारीक नक्षीकामासारखे किंवा ताजमहालासारखे आहे, गावोगाव सरकारी कार्यालय बांधणाऱ्या पी डब्लु डी सारखे सवंग नाही, असे प्रतिपादन करीत आचार्य अत्रे म्हणतात, केशवसुतांच्या काव्यात ओजस्वी तत्वज्ञान आहे, पण कलेचा रेखिवपणा नाही; गोविंदाग्रजांच्या काव्यांत कला व सौंदर्यप्रीति आहे पण जीविताबद्दलचा सुसंगत विचार नाही. रे. टिळकांच्या काव्यात साधेपणा व प्रेमळपणा आहे, पण कल्पनेची विशालता व ऐश्वर्य नाही; बालकवींच्या काव्यांत नाद माधुर्य व तत्वसंशोधनाचे वेड आहे, पण सत्याचा स्पष्ट प्रकाश नाही. या साऱ्या दुर्मिळ गुणांचा समुच्चय बी कवींच्या कवितेत आढळून येतो, असे प्रतिपादन करीत कवी बींना 'कवींचे कवी' म्हणून गौरवतात. रसिका ! अशी दाद ज्या कवीला आचार्य अत्र्यांकडून हयातपणी मिळाली. त्यावर अधिक काही बोलायचा आपल्याला अधिकार ही नाही अन् गरज ही नाही. अशा या श्रेष्ठ कवीचे ३० ऑगस्ट १९४७ रोजी निधन झाले.



### 'चाफा' लता मंगेशकरांच्या सुमधुर स्वरांनी अजरामर झालेली कविता

कवीची चाफा ही सुप्रसिद्ध कविता. या कवितेला लता मंगेशकरानी आपल्या सुमधुर स्वरांनी अधिकच मधुर करून ठेवले आहे. चाफा ह्या कवितेविषयी समीक्षकांच्या वेगवेगळी मतं मतांतरे आहेत. कुणाला चाफा ही कवीची अबोल प्रतिभा व कवीची तिच्याविषयीची तगमग यांचे रूपक वाटते तर कोणाला चाफा हा जीव -आत्मा यांचा संबंध वाटतो. पण बहुमान्य मत म्हणजे चाफा हा रुसलेला प्रियकर असून त्याला रिझवणारी प्रेयसी ते सांगते हे होय. हे मत कवीला ही मान्य असावे, असे दिसते. कवितेच्या लालित्यपूर्ण धृपदात; रुसलेल्या किंवा मुखस्तंभाप्रमाणे स्तब्ध बसलेल्या प्रियकराविषयी प्रेयसीचे भाव व्यक्तविताना कवी लिहितो.

चांफा बोलेना, चांफा चालेना,
चांफा खंत करी काही केल्या फुलेना ।।

## हवामान बदल: कारणे, गंभीर परिणाम आणि भविष्यातील आव्हाने

हवामान बदल (CLIMATE CHANGE) ही आज जगासमोरील सर्वात मोठी आणि गंभीर समस्या बनली आहे. निसर्गाचा समतोल बिघडल्यामुळे जागतिक तापमानात सातत्याने वाढ होत असून, याचे विपरीत परिणाम सजीव सृष्टीवर दिसून येत आहेत.

### हवामान बदलाची मुख्य कारणे

**मानवी हस्तक्षेप व औद्योगिकीकरण:** कारखाने, वाहने आणि ऊर्जा निर्मितीसाठी कोळसा, पेट्रोल, डिझेल यांसारख्या अश्मीभूत इंधनांचा (FOSSIL FUELS) अमर्याद वापर.

**हरीतगृह वायूंचे उत्सर्जन (GREENHOUSE GASES):** कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि नायट्रस ऑक्साइड या वायूंच्या वाढत्या प्रमाणामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे (GLOBAL WARMING).

**बेसुमार वृक्षतोड (DEFORESTATION):** जंगलांचा होणारा ऱ्हास कार्बन शोषून घेण्याची



निसर्गाची क्षमता कमी करत आहे.

**शहरीकरण व प्लास्टिक वापर:** कॉंक्रिटचे जंगल आणि अविरत कचरा यांमुळे स्थानिक हवामानात वेगाने बदल होत आहेत.

### अपेक्षित आणि जाणवणारे गंभीर परिणाम

**अस्मानी संकट आणि अवकाळी पाऊस:** पावसाचे प्रमाण आणि वेळ अनिश्चित झाली आहे. कुठे ढगफुटी आणि महापूर, तर कुठे तीव्र दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण होत आहे.

**शेती क्षेत्रावर थेट फटका:** अनियमित पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान होत असून अर्थकारण कोलमडले आहे.

**हिमनद्या वितळणे:** जागतिक तापमानवाढीमुळे ध्रुवीय प्रदेशातील बर्फ वितळत असून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे, ज्यामुळे किनारपट्टीच्या शहरांना धोके निर्माण झाले आहेत.

**आरोग्यविषयक समस्या:** नवीन आजार, उष्णतेच्या लाटा (HEATWAVES) आणि दूषित पाण्यामुळे आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.

### उपाययोजना व आपली जबाबदारी

**अपारंपरिक ऊर्जेचा वापर:** सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या हरित ऊर्जेकडे (GREEN ENERGY) जलद गतीने वळणे गरजेचे आहे.

**व्यापक वृक्षारोपण व संवर्धन:** केवळ झाडे लावणे नाही, तर ती जगवणे ही काळाची गरज आहे.

**कमीत कमी प्लास्टिक व इंधन वापर:** सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर वाढवणे आणि वैयक्तिक पातळीवर कार्बन फूटप्रिंट कमी करणे.

**शाश्वत जीवनशैली:** नैसर्गिक साधनांचा पुनर्वापर आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे. हवामान बदल हे केवळ कागदावरील संकट नसून आपल्या रोजच्या जीवनावर परिणाम करणारे वास्तव आहे. निसर्गाचे रक्षण ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नसून नागरिकाचे कर्तव्य आहे. आज घेतलेला छोटासा पर्यावरणाभिमुख निर्णय उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करू शकतो.

## नगरपरिषद परिसर मारहाण प्रकरण...

# शिंदे सेनेच्या चार नगरसेवकांसह भाजपच्या बड्या नेत्यावर दंगलीचे गुन्हे दाखल

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**हिवरखेड :** २७ ऑगस्ट रोजी नगर परिषदेच्या मासिक सभेमध्ये व्हिडिओ शूटिंग काढण्याच्या कारणावरून भाजपा व शिंदे सेनेच्या नगरसेवकांमध्ये हाणामारी झाली होती. या घटनेनंतर शिंदे सेनेच्या चार नगरसेवकांसह भाजपाच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



या सभेमध्ये शिंदे सेनेच्या काही नगरसेवकांकडून व्हिडिओ शूटिंग काढण्यात आली. याला उपसभापती अनिता वाकोडे व नगरसेवक दानिश खान यांनी अध्यक्षाची परवानगी नसल्यामुळे व्हिडिओ शूटिंग काढण्यास विरोध केला. मात्र त्या नगरसेवकांनी व्हिडिओ शूटिंग काढणे बंद न केल्यामुळे सभेच्या अध्यक्ष व नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे यांनी व्हिडिओ शूटिंग काढण्याची मी परवानगी दिलेली नसून आपण व्हिडिओ शूटिंग बंद करावी असे सांगितल्यावरही शिंदे सेनेच्या नगरसेवकांकडून शूटिंग काढणे बंद न झाल्यामुळे सभेत आरडाओरड झाली होती. त्यामुळे काही काळ सभा थांबविण्यात येऊन परत नगराध्यक्ष यांच्या परवानगीने सभा संपवण्यात आली.

### नगर परिषद तात्पुरती सील

मुख्याधिकारी यांच्या आदेशाने नगरपरिषद कर्मचारी यांनी नगरपरिषद तात्पुरत्या स्वरूपात सीलबंद केली असून पुढील तपास हिवरखेड ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कांयदे करीत आहेत. सिसिटीव्ही फुटेज देखील ताब्यात घेण्यात येत आहे.

सभा संपल्यानंतर काही वेळातच नगर परिषदेच्या खाली भाजपा शिंदे सेनेच्या नगरसेवक व कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. या हाणामारीत भाजपाचे पाणीपुरवठा सभापती अजितखा जमीर खान व नगराध्यक्ष यांचे पुतणे विशाल कुलट हे जखमी झाले तर शिंदे सेनेचे रवी घुंगळ व ऋषिकेश पंचबुद्धे हे सुद्धा जखमी झाले. हा सर्व प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्या अनुषंगाने शनिवारी प्रथम शिंदे सेनेकडूनकडून नगरसेवक रवी घुंगळ यांच्या फिर्यादीवरून आरोपी विशाल कुलट, आकाश दुतोंडे, सागर दुतोंडे, गणेश दुतोंडे, मंगेश दुतोंडे, योगेश दुतोंडे, रमेश दुतोंडे, (भाजप विस्तारक ) प्रफुल पाचपोर, इकबाल खान इजराइल खान यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता 118 (1), 115 (2), 189 (2), 191, 351(2), 352, 135, 3 (5) कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले.

तर नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे यांच्या फिर्यादीवरून नगरसेवक रवी घुंगळ, ऋषिकेश पंचबुद्धे, रामेश्वर हागे, श्यामशील भोपळे या चार नगरसेवकांसह गोपाल घुंगळ, अक्षय तिजारे, सागर ताळे, महादेव भड, गौरव भुडके, कृष्णा धुळे, शशिकांत शेंडे, राजेश परनाटे गुलाब परनाटे या 13 आरोपींविरुद्ध कलम 118 (1), 115 (2), 189 (2), 190, 352, 135 कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आला. या घटनेमुळे हिवरखेड येथील राजकीय वातावरण तापले असून आता पुढे पोलीस विभागाकडून काय कारवाई केली जाते याकडे हिवरखेड वासियांचे लक्ष लागले आहे. तसेच मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काही काळ चौकशी करिता नगरपरिषद सुद्धा सीलबंद करण्यात आली. पोलिसांचा चोख बंदोबस्त आहे.

# चिंचखेड येथे आदिवासी महिलांचा दारूबंदीसाठी एल्गार

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**पातूर :** पातूर पोलीस स्टेशनपासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर जंगलाच्या कुशीत वसलेल्या चिंचखेड गावात मोठ्या प्रमाणात गावठी दारू विक्री व जुगार सुरू असल्याचा आरोप करीत आदिवासी महिलांनी दारूबंदीच्या मागणीसाठी आज पातूर पोलीस ठाण्यावर धडक दिली.



गावात सुरू असलेल्या अवैध दारू व्यवसायामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून, दारूच्या व्यसनामुळे महिलांना आणि मुलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे महिलांनी पोलिसांच्या निदर्शनास आणून दिले. गावात गावठी दारूची खुलेआम विक्री तसेच जुगार सुरू असल्याने परिसरातील वातावरण बिघडत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

दारूबंदी करून अवैध व्यवसायावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आदिवासी महिलांनी पोलिसांकडे केली. संबंधित अवैध धंद्यांवर तातडीने कारवाई झाली नाही, तर आगामी काळात मोठ्या संख्येने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा महिलांनी दिला.

चिंचखेड परिसरातील अवैध दारू विक्री आणि जुगाराच्या प्रश्नावर पोलीस प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# पितांबर महाराज पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**पातूर :** शिर्ला येथील श्री संत पितांबर महाराज संस्थान, पितांबरवाडी येथे श्री पितांबर महाराज पुण्यतिथी महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला शुक्रवार, दि. २८ ऑगस्टपासून प्रारंभ झाला असून, दि. ३ सप्टेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात दररोज काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ व हरिकीर्तन होणार असून विविध गावांतील वारकरी, भजनी मंडळे व भाविक सहभागी होणार आहेत. नामवंत कीर्तनकारांचे कीर्तनही आयोजित करण्यात आले आहे.

सांगता सोहळ्यात काल्याचे कीर्तन, महाप्रसाद तसेच 3 सप्टेंबर रोजी सोमवारी दुपारी ४ वाजता पातूर शहरातून विविध दिंड्यांच्या सहभागाने श्रींच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

श्री पितांबर महाराज संस्थान, उत्सव समिती, भक्त मंडळ व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बोर्डीचा श्री नागास्वामी महाराज यात्रा महोत्सव

## भाविकांची जमणार मांदियाळी

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोट :** बोर्डीला श्रावण मासातील तिसऱ्या मंगळवारी म्हणजे ३१ रोजी शासनमान्य 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र असलेले संत नागास्वामी महाराजांची यात्रा मोठ्या उत्साहात भरते. यासाठी संपूर्ण विदर्भातून भाविकांची मांदियाळी बोर्डी येथे जमत असते. भाविकांना दर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी संस्थानच्यावतीने शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले आहे.

विदर्भात सुप्रसिद्ध असणारी बोर्डी येथील यात्रा यावर्षी मोठ्या उत्साहात भरणार असून, यात्रेनिमित्त ३९ ऑगस्टला पहाटे ४ वाजता तीर्थ स्थापना झाली. तसेच दररोज सकाळी ५.३०

वाजता ध्यान व त्यांचे महत्त्व यावर प्रवचन झाले, संध्याकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, ७.३० ते ८ वाजता प्रार्थना असा सप्ताहाभर दैनंदिन कार्यक्रम उत्साहात पार पडले. मंगळवार, ३१ सप्टेंबर रोजी यात्रेचा मुख्य



दिवस असून, तर गोपाळकाला मंगळवार १/०९/२०२६ सकाळी११ वाजता दहीहंडी व गोपालकाला होऊन महाराजांच्या पादुकांची भव्य रथप्रदक्षिणा निघणार आहे. यात्रेला भजनी मंडळे, दिंड्या यांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण संस्थानच्या वतीने देण्यात आले. यात्रेनिमित्त आलेल्या सर्व भजनी मंडळांची सोमवार पासूनच भोजनाची व निवासाची व्यवस्था मंदिर समितीने केलेली आहे. यात्रेच्या दिवशी दुपारी ३ वाजेपासून महाप्रसादाला सुरुवात होईल, तरी सर्व भजनी मंडळी, दुकानदार, हॉटेलवाले यांनी सहभाग घेऊन यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन नागास्वामी महाराज संस्थानचे संचालक मंडळ आणि गावकऱ्यांच्यावतीने करण्यात आले,

# मोहन भागवत यांचे न्यूयॉर्कमधील वक्तव्य स्वागतार्ह : जावेद जकरिया

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोला :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी न्यूयॉर्क येथे हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि मानवतेच्या एकतेबाबत केलेले वक्तव्य अत्यंत सकारात्मक आणि स्वागतार्ह आहे. त्यांनी भारतातील मुस्लिम समाजाबाबत मांडलेली भूमिका ही देशातील सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव मजबूत करणारी आहे.

कच्छी मेमन जमात, अकोलाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते जावेद जकरिया यांनी म्हटले की, मोहन भागवत यांनी हे वक्तव्य न्यूयॉर्कमध्ये केले असले तरी यापूर्वीही त्यांनी भारतात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि देशातील विविधतेबाबत सकारात्मक भूमिका मांडली आहे. त्यांचा हा संदेश आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे.

जावेद जकरिया म्हणाले की, संपूर्ण हिंदुस्थानात हिंदू आणि मुस्लिम समाजातील कोट्यवधी नागरिक अनेक वर्षांपासून एकमेकांसोबत शांततेने आणि सलोख्याने राहत आहेत. दोन्ही समाजांमध्ये तेढ निर्माण करणारे लोक अत्यंत कमी आहेत. मात्र सोशल मीडियावर अशा मोजक्या लोकांच्या वक्तव्यांना मोठ्या प्रमाणावर प्रसारित केले जाते. त्यामुळे संपूर्ण देशाचे वातावरण खराब असल्याचा चुकीचा समज निर्माण होतो. प्रत्यक्षात देशातील बहुतांश हिंदू आणि मुस्लिम नागरिक शांतता, बंधुभाव आणि एकतेने राहू इच्छितात.



ते पुढे म्हणाले की, मोहन भागवत यांनी भारतात परतल्यानंतर मुस्लिम समाजातील प्रमुख उलेमा, धार्मिक नेते, बुद्धिजीवी आणि सामाजिक प्रतिनिधींशी संवाद वाढवावा. दोन्ही समाजांमध्ये कुठल्याही प्रकारची गैरसमजूत किंवा अंतर निर्माण झाले असेल, तर परस्पर संवाद आणि भेटीगाठींमधून ते सहज दूर करता येऊ शकते.

जावेद जकरिया म्हणाले की, हिंदू समाजात मोहन भागवत यांच्यासारखे मोठे नेतृत्व आहे, त्याचप्रमाणे मुस्लिम समाजातही अनेक मोठे उलेमा आणि जबाबदार धार्मिक व सामाजिक नेते आहेत. या दोन्ही समाजातील जबाबदार व्यक्तींनी एकत्र येऊन देशाची एकता, शांतता आणि सामाजिक सलोखा मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले, तर समाजात तेढ निर्माण करणाऱ्या मोजक्या लोकांचा प्रभाव आपोआप कमी होईल.

ते म्हणाले की, भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्य ही केवळ देशाची गरज नाही, तर भारताची मोठी ताकद आहे. सोशल मीडियावर नकारात्मक आणि भडकावू संदेशांना प्रसिद्धी देण्याऐवजी समाजाला जोडणाऱ्या विचारांना अधिक बळ देण्याची गरज आहे.

मोहन भागवत यांच्या या सकारात्मक वक्तव्याचे स्वागत करताना जावेद जकरिया यांनी अपेक्षा व्यक्त केली की, या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी हिंदू आणि मुस्लिम समाजातील प्रमुख नेतृत्वाने एकत्र बसून संवादाचे नवे पर्व सुरू करावे. संवाद, विश्वास आणि परस्पर सन्मानाच्या माध्यमातूनच देश अधिक मजबूत आणि एकसंघ होऊ शकतो.

# सेंट पॉल्स अकॅडमी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा



वि. प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोट :** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी येथे 29 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष लूनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटिया ,सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक विजयजी बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक नितीन गावंडे, मालती महल्ले ,सुचिता गायकवाड ,वैशाली गावत्रे यांची मंचावर उपस्थिती होती .

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर वर्ग नववीच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.त्यांना डॉ. अर्चना रायबोले यांचे मार्गदर्शन लाभले. पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले .अभिलाष काळमेघ, प्रणव देंडव ,नारायण वानखेडे ,सुजल काळबेंडे, संगीता सुरळकर ,स्नेहा टोबरे या क्रीडा शिक्षकांचे स्वागत पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. ईश्वरी साबळे व श्रावणी हरणे यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून क्रीडा प्रतिज्ञा म्हणून घेतली व सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ दिली. त्यानंतर गौरी बुंदेले व संगीता सुरळकर मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी क्रीडेवर आधारित नृत्याविष्कार सादर केला. त्यांना सुदर्शन अंभोरे यांचे मार्गदर्शन लाभले . आराध्य थूटे व कुणाल येऊल यांनी सुजल सरांच्या मार्गदर्शनाखाली कीक बॉक्सिंगची प्रात्यक्षिके सादर केली. मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी खेळाचे महत्व विशद केले. बॅडमिंटन ,रस्सीखेच, गोळा फेक, बुद्धिबळ हॉलीबॉल इत्यादी खेळ घेण्यात आले. खेळाचे पंच म्हणून अभिजीत मेंढे, अगस्ती ठाकूर, प्रणव देंडव व विद्या नळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधिका बिहाडे व ईश्वरी साबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन स्नेहा टोबरे यांनी केले.

# लोकजागर मंच व श्रावणमास कावड उत्सव समितीकडून 24 कावड मंडळांचा सन्मान

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोट :** श्रावणमासानिमित्त लोकजागर मंच तथा श्रावणमास कावड उत्सव समिती, अकोटच्या वतीने आयोजित 'विशाल कावड स्पर्धा 2025' चा निकाल व बक्षीस वितरण सोहळा शुक्रवारी सायंकाळी अंजनगाव रोडवरील श्री संत रूपलाल महाराज मंगल कार्यालयात उत्साहाने पार पडला.

शहर व परिसरातील विविध कावड मंडळांनी महादेव भक्तीचा जागर करत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला होता. आकर्षक सजावट, पारंपरिक वाद्ये, शिस्तबद्ध संचलन, ड्रेसकोड आणि सामाजिक संदेश यांसारख्या निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण करण्यात आले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंडळांना



शिवशक्ती महिला कावड यात्रेचे विशेष कौतुक

मान्यवरांच्या हस्ते रोख पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमस्थळी भगवे ध्वज, शिवभक्तांची उपस्थिती आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व 24 मंडळांच्या कार्याचा गौरव करत यंदा प्रथम, द्वितीय, तृतीय अशा पारंपरिक क्रमवारीऐवजी 11 उत्कृष्ट मंडळांची निवड करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी लोकजागर मंचचे संस्थापक अनिलभाऊ गावंडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून या स्पर्धेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, 2018 पासून सुरू असलेल्या या उपक्रमामागे धार्मिक परंपरा जपणे, उत्सवांचे पावित्र्य कायम ठेवणे आणि नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण करणे हा हेतू आहे. धार्मिक उत्सवांमध्ये वाढत असलेल्या अपप्रवृत्तींपासून दूर राहून संस्कृतीचे जतन करणे काळाची गरज असल्याचे नमूद केले.

यावर्षीच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले "शिवशक्ती महिला कावड यात्रा" मंडळ. गेल्या चार वर्षांपासून महिलांच्या सहभागातून कावड यात्रा काढणाऱ्या या मंडळाला प्रथमच स्पर्धेत सहभागी करून घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक सुरेशभाई सेदानी यांच्या हस्ते महिला कावड मंडळाला विशेष सन्मान, रोख पुरस्कार आणि सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आले.

# लाखपुरीच्या श्री लक्षेश्वर मंदिरात श्रावणात भाविकांची मांदियाळी

अनवर खान ३० ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** लाखपुरीच्या पुरातन श्री लक्षेश्वर मंदिरात श्रावणात भाविकांची मांदियाळी असते. रामायणकालीन परंपरेशी जोडलेल्या आख्यायिका, पुरातन मूर्ती, साडेअकरा ज्योतिर्लिंगांच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरेशी असलेले नाते आणि वर्षानुवर्षे अखंड सुरू असलेली कावडयात्रा यामुळे या तीर्थक्षेत्राला विदर्भाच्या धार्मिक नकाशावर विशेष स्थान प्राप्त झाले आहे. श्रावण महिना आणि महाशिवरात्रीच्या पर्वावर लाखो भाविकांच्या उपस्थितीने लाखपुरी परिसर अक्षरशः भक्तिसागरात न्हाऊन निघतो.

श्रावणातील प्रत्येक सोमवार हा लाखपुरीसाठी जणू भक्तीचा उत्सवच ठरतो. सकाळपासून मंदिर परिसरात होणारी भाविकांची गर्दी, कावडयात्रेतील उत्साह आणि धार्मिक मंत्रोच्चारांमुळे संपूर्ण वातावरण शिवमय होऊन जाते.

मंदिरातील शिवलिंगाबाबतही एक वैशिष्ट्यपूर्ण आख्यायिका सांगितली जाते. महादेवाच्या पिंडीचा काही भाग पूर्णा नदीत असून उर्वरित भाग मंदिर परिसरात असल्याची स्थानिक भाविकांची श्रद्धा आहे. या धार्मिक परंपरेमुळे श्री लक्षेश्वराला 'साडेअकरा ज्योतिर्लिंगां'शी जोडलेली वैशिष्ट्यपूर्ण ओळख प्राप्त झाली आहे.

श्री लक्षेश्वर मंदिर परिसरात आढळणाऱ्या पुरातन मूर्ती हे या ठिकाणाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या प्राचीन मूर्ती येथे असल्याचे सांगितले जाते. या मूर्ती मंदिराच्या धार्मिक परंपरेसोबतच परिसराच्या प्राचीन इतिहासाची आणि सांस्कृतिक समृद्धीची साक्ष देतात.

महादेवाचे मंदिर, नंदीची मूर्ती आणि



परिसरातील अन्य देवतांची मंदिरे यामुळे येथे विविध धार्मिक परंपरांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. लाखपुरीचे हे मंदिर भाविकांसाठी श्रद्धास्थान तर आहेच; इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्वीय दृष्टीनेही त्याचे महत्त्व अधोरेखित होते.

### कावडयात्रेतून भक्तीचा जागर

श्रावण महिना सुरू झाला की लाखपुरीत भक्तीचा जागर सुरू होतो. पंचक्रोशीतील कावडधारी भाविक पूर्णा नदीचे जल घेऊन पदयात्रेने अथवा कावडीसह मंदिरात दाखल होतात. श्री लक्षेश्वराच्या पिंडीवर पवित्र जल अर्पण करून भगवान शंकराच्या चरणी श्रद्धा व्यक्त केली जाते. नागपंचमीच्या दिवशी विशेष पूजा, काकड आरती आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. श्रावणातील सोमवार तसेच महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिर परिसरात धार्मिक वातावरण अधिकच बहरते. महाशिवरात्रीनिमित्त महाप्रसादाचे आयोजनही केले जाते.

### धार्मिकतेसोबत सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम

श्री लक्षेश्वर मंदिर हे केवळ पूजा-अर्चनेचे ठिकाण राहिलेले नाही. धार्मिक कार्यक्रमांसोबतच श्रावण सोमवार आणि महाशिवरात्रीच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामुळे मंदिर परिसर हा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा केंद्रबिंदूही बनला आहे. हे गाव कविवर्य उ. रा. गिरी यांचे गाव म्हणूनही ओळखले जाते. या पुरातन मंदिराचा इतिहास आणि धार्मिक परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी वारशाचे शास्त्रोक्त जतन, परिसराचा विकास, भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा आणि धार्मिक पर्यटनाला चालना देणे गरजेचे आहे. श्रद्धा आणि इतिहासाचा हा अनमोल वारसा आधुनिक सुविधांच्या बळावर जपला गेला, तर लाखपुरीचे श्री लक्षेश्वर मंदिर भविष्यात विदर्भातील महत्त्वाच्या धार्मिक पर्यटनस्थळांपैकी एक म्हणून अधिक व्यापक लौकिक मिळवू शकते.

# मुकेश काळबांडे यांची भाजप शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती



प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**मुर्तीजापूर :** भारतीय जनता पार्टीच्या मुर्तीजापूर शहर उपाध्यक्षपदी मुकेश देविदासराव काळबांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुकेश काळबांडे यांच्या नियुक्तीचे अधिकृत प्रमाणपत्र आमदार हरीशभाऊ मारोतीआप्पा पिंपळे, भाजपा अकोला (ग्रामीण) जिल्हाध्यक्ष संतोषभाऊ शिवरकार तसेच मुर्तीजापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष हर्षल साबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी भाजपाचे गटनेते गजानन नाकाट, विनायक वारे संजय जयस्वाल यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध आघाड्यांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मुकेश काळबांडे यांचे अभिनंदन केले. पक्षाने दिलेली जबाबदारी पार पाडत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहणार .

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## विनायक माने कर्तृत्वभूषण पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**उमरखेड** : यवतमाळ जिल्हा वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष विनायकराव महाराज माने यांना यंदाचा प्रतिष्ठित कर्तुत्वभूषण राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. बी. एस. एफ. व प्रतिबिंब बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने अमरावती येथे २२ ऑगस्ट रोजी झालेल्या सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान

करण्यात आला. हिवरा संगम येथील रहिवासी माने महाराज हे वारकरी परंपरे सोबत सामाजिक कार्यात नेहमीच तत्पर असतात वारकरी संप्रदायाचे निशिम पाईक व सामाजिक कार्याच्या योगदानाबद्दल त्यांचा गौरव करणे हा या सोहळ्याचा उद्देश असल्याचे प्रमुख आयोजक भूषण सरदार यांनी सांगितले आहे.



# आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांना हिरवा कंदील

**लॉंग मार्चने आली शासनाला जाग :** दोन जाचक जीआर रद्द; विद्यार्थ्यांच्या मृत्यूस १ कोटींची मदत, बोगस प्रमाणपत्रधारकांवर फौजदारी कारवाई

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**बाभूळगाव** : आदिवासी विद्यार्थ्यांच्या १९ प्रलंबित मागण्यांसाठी अमरावती विभागातील ३२५ विद्यार्थ्यांनी काढलेल्या लॉंग मार्चने अखेर शासनाचे लक्ष वेधून घेतले. अमरावतीहून सुरू झालेला हा मोर्चा यवतमाळमार्गे बाभूळगावात दाखल झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात ठिय्या दिला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी रात्री साडेअकराच्या सुमारास आंदोलनस्थळी धाव घेत विद्यार्थ्यांशी चर्चा केली. तब्बल अडीच वाजेपर्यंत झालेल्या चर्चेनंतर अनेक मागण्यांवर लेखी आश्वासन देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील प्रमुख मागणी असलेले ५ ऑगस्ट आणि १४ ऑगस्ट २०२६ रोजीचे दोन्ही जाचक शासन निर्णय रद्द करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. 'कंडिशनल व्हॅलिडिटी'सह विविध अटींना विद्यार्थ्यांनी तीव्र विरोध केला होता. आता ११ नोव्हेंबर २०११च्या शासन निर्णयात अद्ययावत बदल करून महिनाभरात नवीन जीआर काढण्यात येणार असून, त्यातील वयोमर्यादा पूर्णतः रद्द केली जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळविणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. तसेच सहा महिन्यांत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी १५ दिवसांची मुदत निश्चित करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

आश्रमशाळा किंवा वसतिगृहात दुर्घटनेत विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास संबंधित कुटुंबाला एक कोटी रुपये, कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ५० लाख रुपये आणि गंभीर दुखापत झाल्यास २५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचा स्वतंत्र शासन निर्णय १५ दिवसांत काढण्यात येणार आहे.

पेसा क्षेत्रातील १७ पैकी नऊ संवर्गांची भरती सुरू झाली असून उर्वरित आठ संवर्गांची भरती तातडीने सुरू करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे रखडलेल्या भरती प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.

**एक सप्टेंबरला मंत्रालयात महाबैठक**

FCI विरुद्ध जगदीश बहिरा प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे बळकावलेल्या पदांचाही प्रश्न चर्चेत आला. यापूर्वी १२ हजार ५२० कर्मचाऱ्यांचा आकडा सांगितला जात असताना प्रत्यक्षात ६ हजार ८६० कर्मचारी अधिसंख्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यापैकी १ हजार ५६४ पदे भरली असून उर्वरित पदे तीन महिन्यांत भरण्याचे आश्वासन देण्यात आले.

वसतिगृहातील डीबीटी आणि आश्रमशाळांमधील सेंट्रल किचन पद्धत १५ दिवसांत रद्द करून विद्यार्थ्यांना ताजे भोजन देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच पुणे, मुंबई, नागपूर आणि संभाजीनगर येथील विद्यापीठ परिसरात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृहे उभारण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनानेही मोठा बंदोबस्त तैनात केला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी, उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपविभागीय अधिकारी गोपाल देशपांडे, धारणी प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांच्यासह महसूल व पोलीस अधिकारी सायंकाळी सहा ते पहाटे चारपर्यंत आंदोलनस्थळी तळ ठोकून होते. बाभूळगाव, कळंब व यवतमाळ पोलिसांसह राज्य राखीव दलाचे कमांडो तैनात करण्यात आल्याने परिसराला छावणीचे स्वरूप आले होते.

दिनेश मडावी यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळे आंदोलनाला यश मिळाल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला असून, शासनाने दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरतात का, याची खरी परीक्षा आता १ सप्टेंबरच्या बैठकीनंतर होणार आहे.

### १ सप्टेंबरला अंतिम फैसला?

■ रोस्टरमधील बिंदू पाचवरून दोन करण्याच्या मागणीवर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जनजाती सल्लागार परिषदेची बैठक घेण्यात येणार आहे. दरम्यान, उर्वरित मागण्यांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी १ सप्टेंबर रोजी मंत्रालयात महत्त्वपूर्ण महाबैठक आयोजित करण्यात आली आहे. सात प्रधान सचिवांसह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उर्वरित मागण्यांवर अंतिम शिक्कामोर्तब होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांच्या विहिरीतील मोटारी चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**११ मोटारी, ८२५ फूट केबलसह ३.९९ लाखांचा मुद्देमाल जप्त**

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**यवतमाळ** : वडगाव (जंगल) पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेतातील विहिरी व बोअरमधील पाण्याच्या मोटारी तसेच केबल चोरीच्या वाढत्या घटनांनी शेतकरी त्रस्त झाले होते. या चोरीच्या घटनांना आळा घालत वडगाव पोलिसांनी मोटार चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून ११ मोटारी, ८२५ फूट केबल, चोरीची दुचाकी आणि चोरीसाठी वापरलेली मोटार असा एकूण ३ लाख ९९ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

वडगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार विकास दांडे यांनी चोरीच्या घटनांचा बारकाईने अभ्यास करून रात्रगस्त वाढविण्यासह गस्तीच्या मार्गातही बदल केला. चोरीच्या ठिकाणी भेटी देऊन शेतकऱ्यांशी संपर्क वाढवित संशयितांचा शोध सुरू करण्यात आला.

दरम्यान, २३ ऑगस्ट रोजी रात्री दीडच्या सुमारास PSI भाऊराव बोकडे हे पिंपरीबुट्टी परिसरात रात्रगस्त करीत असताना रस्त्याच्या कडेला MH 20 AX 5999 क्रमांकाची वॅगनआर कार बराच वेळ उभी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कारजवळ बराच वेळ थांबूनही चालक न आल्याने पोलिसांना संशय आला. दुसऱ्या दिवशी पिंपरीबुट्टी परिसरातील सात शेतकऱ्यांच्या विहिरीतील मोटारी व केबल चोरीला गेल्याचे समोर आले. याप्रकरणी शेतकऱ्यांनी वडगाव पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या. त्यानंतर पोलिसांनी रात्री संशयास्पदरीत्या आढळलेल्या कारचा तपास सुरू केला. ही कार यवतमाळ शहरातील अंबानगर येथील असल्याचे निष्पन्न झाले. अवधूतवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मदतीने कार व चालक राजेंद्र विजय भेदे (२७, रा. तळेगाव दशासर, ता. धामणगाव, जि. अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. कारची झडती घेतली असता दोन मोटारी व केबल आढळून आली. चौकशीतून पोलिसांनी चोरीचा मोठा मुद्देमाल हस्तगत केला.

जप्त केलेल्या मुद्देमालात ११ मोटारी, ८२५ फूट केबल, अकोला बाजार परिसरातून चोरीस गेलेली होंडा शाईन दुचाकी तसेच चोरीसाठी वापरलेली वॅगनआर कारचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठविले आहे. त्याचे इतर साथीदार निष्पन्न झाले असून त्यांचा शोध सुरू आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस जमादार पंकज दोनाडकर व शिवाजी शिंदे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार विकास दांडे, PSI भाऊराव बोकडे, पोलीस जमादार वासुदेव साटोने, अक्षय डोंगरे, पुकार वाकोडे, सागर केराम, अनिल गिनगिने व सूरज मेश्राम यांच्या पथकाने केली.

## ईद मिलादुन्नबी : लोहार लाईनमध्ये मान्यवरांचा सत्कार

**नगरसेवक प्रा. फिरोज खान यांचा सन्मान**

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**पुसद** : ईद मिलादुन्नबीच्या पवित्र पर्वानिमित्त लोहार लाईन येथील मौलाना अबुल कलाम आझाद चौकात सामाजिक एकता, बंधुभाव आणि सौहार्दाचा संदेश देणारा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. ईद मिलादुन्नबीच्या भव्य मिरवणुकीत सहभागी झालेले समाजबांधव, पोलीस अधिकारी, पत्रकार तसेच मुस्लिम समाजातील मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

मिरवणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी तसेच सामाजिक सलोखा आणि एकोपा वाढविण्यासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी नगरसेवक प्रा. फिरोज खान यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विक्की गौरी, अब्दुल रहेमान चव्हाण, मतीन चव्हाण, फारूक चव्हाण, जम्मा गौरी व सोहेल निरबान यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी माजी उपाध्यक्ष व नगरसेवक डॉ. मोहम्मद नदीम, जुलूस कमिटीचे अध्यक्ष खान मोहम्मद खान, उपाध्यक्ष सैय्यद ईश्तियाक, नगरसेवक डॉ. अकील मेमन, हाजी हनिफ चव्हाण, हाजी गफ्फार कुरेशी, आरोग्य सभापती मजहर खान पठाण, नगरसेवक प्रा. विशाल घाटे, रियाज कुरेशी, सैय्यद अब्बास, पत्रकार मजीद खान, अनवर जिंदरान, जाकीर जिंदरान, फिरोज तगाले, शेखे दादा आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण झाले.

## पोलिसांना राखी बांधून घेतले रक्षणाचे वचन

माउंट लिटेरा झी स्कूलच्या चिमुकल्यांनी गाठले पोलिस ठाणे; झाडांनाही राखी बांधून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

प्रतिनिधी ३० ऑगस्ट






**महागाव** : रक्षाबंधनानिमित्त माउंट लिटेरा झी स्कूलमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळेतील तीन ते पाच वर्षे वयोगटातील चिमुकल्यांनी थेट पोलिस ठाणे गाठून पोलिस बांधवांना स्वतः तयार केलेल्या राख्या बांधल्या. तसेच पोलिसांकडून रक्षणाचे वचन घेत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

पोलिस हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असतात. त्यांच्या सेवाभावाबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पोलिसांना राखी बांधत प्रेम, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. यावेळी पोलिसांनीही चिमुकल्यांशी संवाद साधत त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

शाळेतील सुरक्षा रक्षक आणि स्कूल बस चालकांनाही विद्यार्थ्यांनी राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम केला. या माध्यमातून रक्षाबंधनाचा व्यापक अर्थ विद्यार्थ्यांना अनुभवता आला.

दरम्यान, शाळेत हस्तनिर्मित व निसर्गरम्य राखी बनविण्याच्या स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक व नाविन्यपूर्ण राख्या तयार केल्या.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील झाडांनाही राखी बांधली. झाडे प्राणवायू, सावली व जीवनदायी पर्यावरण देतात, याची जाणीव करून देत 'झाडे वाचवा, निसर्ग जपा' हा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

पोलिस, सुरक्षा रक्षक, स्कूल बस चालक आणि निसर्गाशी रक्षाबंधनाचे नाते जोडणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व संस्कारक्षम ठरला.

## ५० वर्षांची वाट अडवली; चार एकर शेती पेरणीविना

वृद्ध शेतकरी सुखदेव लोखंडेंची प्रशासनाकडे धाव; आदेश होऊनही कायमस्वरूपी रस्ता मिळेना

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**दिग्रस** : सावंगा बुद्रुक गावालगतच्या निंबा परिसरातील तब्बल ५० वर्षांपासून वापरात असलेला शेतरस्ता अडविल्याने वृद्ध शेतकरी सुखदेव लोखंडे यांच्या चार एकर शेतीची पेरणी रखडली आहे. रस्त्यावर कंपाउंड व गेट उभारून त्यास कुलूप लावण्यात येत असल्याने शेतात जाण्यास अडथळा निर्माण होत असल्याचा आरोप लोखंडे यांनी केला आहे.

लोखंडे यांच्यासोबत वृद्ध पत्नी असून, आई-वडिलांचे छत्र हरवलेली तीन नातवंडेही त्यांच्या आधारावर आहेत. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असताना शेतात जाण्याचा मार्गच बंद झाल्याने कुटुंबासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. खरीप हंगामातील पेरणी वेळेत न झाल्यास मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

शेतरस्त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी लोखंडे यांनी स्थानिक प्रशासनापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत धाव घेतली आहे. प्रशासनाकडून शेतरस्ता उपलब्ध करून देण्याचा आदेश झाल्याचे सांगण्यात येत असले, तरी प्रत्यक्षात शेतापर्यंत कायमस्वरूपी मार्ग उपलब्ध झालेला नसल्याची त्यांची तक्रार आहे. सध्या चार-पाच शेतकऱ्यांच्या शेतातून पर्यायी वाट उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, ही वाट संबंधित शेतकऱ्यांच्या इच्छेवर अवलंबून असल्याने भविष्यात पुन्हा अडथळा निर्माण होण्याची भीती लोखंडे यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, रस्ता अडविण्यामागे जातीय कारण असल्याचा गंभीर आरोपही लोखंडे यांनी केला आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

प्रशासनाने केवळ कागदोपत्री आदेश न काढता प्रत्यक्ष पाहणी करून ५० वर्षांपासून वापरात असलेला शेतरस्ता कायमस्वरूपी खुला करून द्यावा, अशी मागणी होत आहे.

## मातंग समाजाला अनुसूचित जाती आरक्षणातून ८ टक्के आरक्षण द्या

**उमरखेडमध्ये २ सप्टेंबरला सकल मातंग समाजाचा जनआक्रोश महामोर्चा**

प्रतिनिधी ३० ऑगस्ट




**उमरखेड** : अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ तसेच मातंग समाजाला अनुसूचित जातीच्या आरक्षणातून स्वतंत्र आठ टक्के आरक्षण देण्याच्या मागणीसाठी उमरखेड येथे बुधवार (ता. २) सकल मातंग समाजाच्या वतीने जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. आंदोलनाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी रविवारी (ता. २९) माजी आमदार नामदेव ससाणे यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेण्यात आली.

यावेळी ससाणे म्हणाले, अनुसूचित जातीमध्ये ५९ जातींचा समावेश असून, या समाजासाठी १३ टक्के आरक्षणाची तरतूद आहे. मात्र, आरक्षणाचा लाभ सर्व घटकांना समान प्रमाणात मिळालेला नाही. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिलेल्या घटकांना न्याय मिळण्यासाठी अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण आवश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

"मातंग समाजाचा अपेक्षित विकास झालेला नाही. आमचे आरक्षण आमच्या वाट्याला मिळाले पाहिजे. अनुसूचित जातीच्या यादीत मातंग समाज दुसऱ्या क्रमांकावर असतानाही अपेक्षित लाभ मिळालेला नाही," असे ससाणे यांनी सांगितले. अनुसूचित जातीतील अविकसित घटकांचे 'अ', 'ब', 'क', 'ड' अशा पद्धतीने उपवर्गीकरण करण्याची मागणीही त्यांनी केली.

**माजी आमदार नामदेव ससाणे यांचा शासनाला इशारा**

समाजातील विविध घटकांनी परस्परांबद्दल अपशब्दांचा वापर टाळून सलोखा राखावा, असे आवाहनही ससाणे यांनी केले. "महापुरुषांचे विचार अंगीकारून आम्ही संस्कारित झालो आहोत. कोणाचाही अपमान करणे हा आमचा मार्ग नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच २९ सप्टेंबरला मुंबईत महामोर्चा काढण्यात येणार असून, आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत मुंबई सोडणार नाही, असा इशाराही ससाणे यांनी दिला. पत्रकार परिषदेला उत्तम काळे, दत्तात्रय काळे, डी. एस. ससाने, शेवंतराव गायकवाड, अतुल खंदारे, कैलास इंगोले, राजेश पटोणे, दामोदर इंगोले, कृष्णा लांबतीले, कृष्णा काळे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; तरुणाविरुद्ध पॉक्सोचा गुन्हा दाखल

**वैद्यकीय तपासणीत मुलगी गर्भवती असल्याचे निष्पन्न**

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**उमरखेड** : अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी १८ वर्षीय तरुणाविरुद्ध उमरखेड पोलिस ठाण्यात पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैद्यकीय तपासणीत पीडित मुलगी १९ ते २० आठवड्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी १७ वर्षे १० महिन्यांची असून बारावीचे शिक्षण घेत आहे. तिची आरोपी तरुणाशी ओळख झाली होती. त्यानंतर मोबाईलवरून दोघांमध्ये संपर्क वाढला. पुढे आरोपीने मुलीला त्याच्या घरी बोलावून घेतल्याचे तिच्या जबाबातून समोर आले आहे. एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत आरोपीच्या घरी तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार झाल्याचे मुलीने पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे. दरम्यान, २५ ऑगस्ट रोजी पोटदुखीचा त्रास जाणवल्यानंतर तिने कुटुंबीयांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी तिला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय तपासणीत ती सुमारे १९ ते २० आठवड्यांची गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर कुटुंबीयांच्या उपस्थितीत पोलिसांनी तिचा जबाब नोंदविला. या जबाबाच्या आधारे आरोपीविरुद्ध पॉक्सो कायद्यासह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी प्रकरणातील पुरावे, जबाब आणि इतर बाबींच्या अनुषंगाने तपास सुरू केला असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश मुंढे करीत आहेत.

## जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क साधावा

**अमरावती :** जात वैधता प्रमाणपत्रातील अद्याप त्रुटींची पूर्तता केली नसेल अशा विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन करत प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती कार्यालय शनिवार 29 आणि रविवार 30 ऑगस्ट 2026 या सुट्टीच्या दिवशीही पूर्णवेळ सुरू ठेवण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी, वैद्यकीय, आयुष आणि कला शिक्षण) प्रवेश प्रक्रियेसाठी राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटींची पूर्तता केलेली नाही.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी वीरेंद्र जगताप मैदानात

### विद्यार्थ्यांसोबत मांजरखेड ते सातेफळ फाटा पायी प्रवास; खासदार बळवंत वानखडे यांचा विद्यार्थ्यांना ठाम पाठिंबा

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**चांदूर रेल्वे:** आदिवासी विद्यार्थी संघटनेच्या वतीने विविध न्याय्य मागण्यांसाठी आदिवासी विकास मंत्री मा. अशोक उईके यांच्या निवासस्थानावर मोर्चा काढण्यात आला. यवतमाळच्या दिशेने पायी निघालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या रॅलीला माजी आमदारवीरेंद्र जगताप यांनी प्रत्यक्ष सहभागी होत ठाम पाठिंबा दिला.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत वीरेंद्र जगताप यांनी मांजरखेड कसबा ते सातेफळ फाटा असा विद्यार्थ्यांसोबत पायी प्रवास केला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी ते प्रत्यक्ष रस्त्यावर उतरले.

त्यांच्यासोबत महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव मा. परीक्षित दादा जगताप हेदेखील पायी सहभागी झाले.

**"आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या रास्त; सरकार डोळे असूनही आंधळे झाले आहे" - वीरेंद्र जगताप**

यावेळी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, "आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या रास्त आहेत. मात्र हे सरकार डोळे असूनही आंधळे झाले आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन त्या मान्य कराव्यात."

'छात्रों की गुंज' कार्यक्रमात एका आदिवासी विद्यार्थिनीने शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींच्या प्रेग्नन्सी टेस्टच्या माध्यमातून मानसिक छळ केला जात असल्याची व्यथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासमोर मांडली होती. अशा गंभीर घटनांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी वीरेंद्र जगताप यांनी केली.

### परीक्षित दादा जगताप यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित दादा जगताप यांच्या नेतृत्वात चांदूर रेल्वे शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांच्या रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी मांजरखेड येथे चहाची व्यवस्था, चांदूर रेल्वे येथील काँग्रेस पक्ष कार्यालय व शिवाजी महाराज चौक येथे चहा-नाश्ता, तर सातेफळ फाटा येथे दुपारच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली. परीक्षित जगताप यांनीही वीरेंद्र जगताप यांच्यासोबत मांजरखेड कसबा ते सातेफळ फाटा पायी चालत विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभाग घेतला.

### अशोक उईके हे देवेंद्र फडणवीस व RSSचे हस्तक - खासदार वानखडे

सातेफळ फाटा येथे अमरावती जिल्ह्याचे खासदार मा. बळवंत वानखडे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला ठाम पाठिंबा दिला.

यावेळी खासदार बळवंत वानखडे यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्यावर जोरदार आरोप करत, "अशोक उईके हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि RSSचे हस्तक म्हणून काम करत आहेत. आदिवासी समाजातील विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे गेलेला त्यांना चालत नाही. आदिवासी विद्यार्थ्यांच्या अधिकारांवर गदा आणण्याचे काम सरकारकडून केले जात आहे," असा आरोप केला.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या रास्त मागण्या तातडीने मान्य करून त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी केली. सातेफळ फाटा येथे मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्तात जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अमरावती, आदिवासी विकास आयुक्त यांनी इतरही अधिकारी कर्मचारी ताफ्यासह आंदोलन कर्त्यांशी चर्चा केली. त्यांनी मंत्री अशोक उईके याठिकाणी येणार आहे असे आश्वासन देत राहिले.

पण तब्बल दोन/तीस होऊनही मंत्री आले नाही. त्यामुळे शासनाच्या दबावाने प्रशासनाकडून अडवणूक करण्यात येत असल्याचे आंदोलनकर्त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी खा बळवंत वानखेडे, माजी आमदार प्रा वीरेंद्र जगताप यांचेसह पुढील मार्गस्थ झाले.

**काँग्रेस विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठाम**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या या रास्त मागण्यांसाठी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष पायी चालत आंदोलनाला पाठिंबा दिला, तर परीक्षित दादा जगताप यांच्या नेतृत्वात चांदूर रेल्वे शहर काँग्रेस कमिटीने विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या प्रवासासाठी चहा-नाश्ता व भोजनाची व्यवस्था केली. खासदार बळवंत वानखडे यांनीही सातेफळ फाटा येथे विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

# जिजाऊ ब्रिगेडच्या अमरावती पदाधिकाऱ्यांची 'मानव विकास केंद्रा'ला सदिच्छा भेट

### राजाभाऊ व प्रीतीताई जोध यांचा राष्ट्रमाता जिजाऊ प्रतिमा देऊन सत्कार

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**अमरावती:** जिजाऊ ब्रिगेड, अमरावती च्या वतीने दिनांक २३ ऑगस्ट २०२६ रोजी 'मानव विकास प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र, खापा' येथे सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या सामाजिक कार्याची पाहणी करण्यात आली.

या भेटीदरम्यान जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रात वास्तव्यास असलेल्या मानसिक आजाराने प्रभावित, निराधार व पुनर्वसनाची गरज असलेल्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला. संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या निवास, आरोग्यसेवा, समुपदेशन, कौशल्य प्रशिक्षण, क्रीडा व स्वावलंबन विषयक विविध उपक्रमांची सविस्तर माहिती त्यांनी घेतली आणि या कौतुकास्पद कार्याची प्रशंसा केली.

मानसिक आरोग्य व पुनर्वसन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे संस्थेचे संचालक राजाभाऊ जोध व प्रीतीताई जोध यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांची प्रतिमा देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या भेटीत सामाजिक कार्य, महिलांचा वाढता सहभाग, मानसिक आरोग्य आणि पुनर्वसनाचे महत्त्व यावर सकारात्मक चर्चा झाली. या उपक्रमामुळे भविष्यात जिजाऊ ब्रिगेड आणि मानव विकास संस्था यांच्यात सामाजिक कार्यात परस्पर सहकार्याची नवी दिशा निर्माण झाली आहे. भेटीच्या शेवटी मानव विकास केंद्राच्या वतीने उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष हर्षा ढोक, जिल्हा सचिव मंजुषा पाथरे, महानगर अध्यक्ष प्रतिभा रोडे, प्रदेश संघटक मनाली तायडे यांच्यासह शीला पाटील, पुष्पाताई चौधरी, कीर्तिमाला चौधरी, मीनाक्षी जाधव, कविता साखरे, प्रीती धुमाळे, प्रणिता इंगोले, वंदना इंगळे, शालिनी वाडीगारे, वैशाली पाचडे, सविता मेतकर, संध्या देशमुख, अनिता गावंडे, छाया कडू, भारती आडगोकार, अरुणा इंगोले, वंदना लोखंडे, छाया केने, विजया वानखडे व माधवी शेळके प्रामुख्याने उपस्थित होत्या.

# नीट -पीजी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर शहरात आज जमावबंदी आदेश लागू

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अमरावती :** नीट- पीजी परीक्षा केंद्रांच्या 100 मीटर परिसरात 30 ऑगस्ट रोजी जमावबंदी आदेश लागू करण्यात आला असून, नियम मोडल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिला आहे.

राष्ट्रीय परीक्षा मंडळातर्फे रविवार, 30 ऑगस्ट 2026 रोजी ' नीट -पीजी एंट्रान्स परीक्षा 2026' आयोजित करण्यात आली आहे. अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील एकूण 6 परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार, अनुचित प्रकार किंवा शांतताभंग होऊ नये यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 च्या कलम 163 अन्वये पोलीस आयुक्तांनी हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

हा जमावबंदी आदेश 30 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 6 ते दुपारी 1 वाजेपर्यंत लागू राहील. परीक्षा केंद्रांच्या 100 मीटर त्रिज्येच्या आत अनधिकृत व्यक्तींना फिरण्यास सक्त मनाई आहे. केवळ परीक्षार्थी, परीक्षा कर्तव्यावर असलेले कर्मचारी आणि शासनमान्य व्यक्तींनाच प्रवेश असेल. परीक्षा संपल्यानंतर परीक्षार्थ्यांनी तत्काळ परिसर खाली करणे बंधनकारक आहे.

100 मीटर परिसरात कोणत्याही प्रकारची वाहने पार्क करण्यास बंदी आहे. मात्र, अपंग विद्यार्थी, परीक्षा समन्वयक-कर्मचारी आणि स्थानिक रहिवाशांच्या वाहनांना यातून सूट देण्यात आली आहे.परीक्षा केंद्रांच्या 100 मीटर परिसरातील एसटीडी-टेलिफोन बूथ, झेरॉक्स सेंटर्स, संगणक दुकाने, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि फेरीवाले परीक्षा संपेपर्यंत पूर्णपणे बंद राहतील.

# नागपूरच्या रुग्णावर डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी किडनी प्रत्यारोपण

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

### वडिलांनी दिले मुलीला जिवनदान



**अमरावती:** स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे वडिलांनी आपल्या अठरा वर्षीय मुलीला किडनी दान करून दिला पुनर्जन्म. खामला, नागपूर रहिवासी, एका मध्यमवर्गीय कुटुंबातील श्रेया विनोद कानोडे ही गेल्या एक वर्षापासून किडनी आजाराने त्रस्त होती. नागपूर व नंतर सावंगी मेघे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार घेतल्या नंतर तिने, अमरावती शहरातील डॉ अविनाश चौधरी नेप्रोलॉजिस्ट यांच्याकडे उपचार घेत असताना, तिला डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हा यावरील प्रभावी उपचार सुचविला, यात श्रेयाचे वडील विनोद रामभाऊ कानोडे आपल्या मुलीला किडनी दान देण्यास तयार झाले. तर सर्व तपासणीअंती आपल्या मुलीच्या भविष्याचा विचार करता खंबीर मनाने स्वतः खाजगी नोकरीत असलेले पंचेचाळीस वर्षीय विनोद रामभाऊ कानोडे यांनी स्वतःची किडनी दान करून समाजासमोर अवयवदानाचा आदर्श ठेवला. यात त्यांच्या सर्व नातेवाईकांनी देखील संमती दिली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे,डॉ विक्रम देशमुख, डॉ विशाल बाहेकर ,डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, डॉ अक्षय बोराडे , नेफ्रॉलॉजिस्ट डॉ अविनाश चौधरी, बधीरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ दिपाली गोटे, डॉ रोहित हातगावकर, डॉ विद्या इसळ, डॉ रोहन चव्हाण, डॉ ऐश्वर्या नायर,डॉ सलोनी देशमुख यांचा मोलाचा वाटा होता. चार-पाच तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली.

# अवैधरित्या दारु निर्मीती व विक्री बाबत विशेष मोहीम

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**अमरावती:** अमरावती गुन्हे शाखेच्या वतीने अवैध्यरित्या दारू निर्मीती व विक्री बाबत विशेष मोहीम पोलिसांनी राबवण्यात आली.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे कडुन पोलीस आयुक्तालय हददीमधे गावठी दारू निर्मीती व विक्री करणा-या इसमावर कार्यवाही करण्या करीता विशेष मोहीम राबवुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

दारूबंदी अधिनियमान्वये कार्यवाही पोस्टे फ्रेजरपुरा हददीमधील परिहारपुरा वडाळी येथे महीला आरोपी संगीता गेंदालाल बेनिवाल वय ४३ वर्ष रा. परिहारपुरा, वडाळी, अमरावती ही राहत्या घराच्या आवा-यात अवैध्यरित्या रनिंग गावठी हात भटटीवर गावठी दारू काढताना मिळून आल्याणे तीचे ताब्यातुन गावठी दारू १०० लिटर, मोहमास सळवा २०० लिटर व इतर साहीत्य असा एकुण कि.अ. ७५,७५०/- रू चा प्रोव्हि मुददेमाल जप्त करूण पोस्टे फेजरपुरा येथे कलम ६५ (क) (फ) (ड) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोस्टे फ्रेजरपुरा हददीमधील महादेव खोरी येथे आरोपी भीमराव दामोदर गडलिंग वय ४५ वर्ष रा. महादेव खोरी, अमरावती हा राहत्या घराच्या आवा-यात अवैध्यरित्या देशी दारूची विक्री करीत असताना मिळुन आल्याणे त्याचे ताब्यातुन कि.अ. २,०००/- रू चा प्रोव्हि मुददेमाल जप्त करूण पोस्ट फेजरपुरा येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त (परिमंडळ १) यशवंत सोळंके,पोलीस उपायुक्त (परिमंडळ २) श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे प्रांजली सोनवणे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो. नि. अतुल वर यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये मेजर ध्यानचंद जयंती उत्साहात साजरी



**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले. मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडाक्षेत्रातील अतुलनीय योगदानाची विद्यार्थ्यांना माहिती देत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपले क्रीडाकौशल्य दाखविले. विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण, खिलाडूवृत्ती आणि शारीरिक तंदुरुस्ती यांचा विकास व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना "खेळा, तंदुरुस्त राहा आणि यशस्वी व्हा" हा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहभाग यामुळे संपूर्ण वातावरण क्रीडामय झाले. विद्यालयाचे प्राचार्य सचिन दुर्गे सर, उपप्राचार्या सोनल निस्ताने मॅडम तसेच शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त अमरावतीत भव्य 'जनजागृती रॅली'

### 'नशामुक्त अमरावती' अभियानातून ८०० विद्यार्थ्यांसह २०० पोलीस अधिकारी-अंमलदारांचा सहभाग

प्रतिनिधी ३० ऑगस्ट




**अमरावती:** राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून अमरावती शहर पोलीस आयुक्तालय व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ (HVPM) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त अमरावती अभियान' अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये व युवकांमध्ये अंमली पदार्थांविरोधात जनजागृती करण्यासाठी आज भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या परिसरातून रॅलीला सुरुवात झाली. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते रॅलीला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. या रॅलीमध्ये सुमारे ८०० विद्यार्थी आणि २०० पोलीस अधिकारी व अंमलदार उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. 'नशामुक्त अमरावती', 'व्यसनाला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार' अशा संदेशांद्वारे युवकांना अंमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले.

क्रीडा ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली असून युवकांनी व्यसनांपासून दूर राहून क्रीडा व सकारात्मक उपक्रमांकडे वळावे, तसेच अमरावती शहराला नशामुक्त करण्यासाठी सामूहिक सहभाग द्यावा, असा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

रॅलीचा मार्ग श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ पासून राजकमल चौक पर्यंत असा होता. राजकमल चौक येथे विद्यार्थ्यांकडून व क्रीडापटूंकडून विविध क्रीडा प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या प्रात्यक्षिकांमधून शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडावृत्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. त्यानंतर 'वंदे मातरम्' व राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमास पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, पोलीस आयुक्त श्री. राकेश ओला, पोलीस उपआयुक्त श्रीमती प्रांजली सोनवणे, डॉ. माधुरी चेंडके, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, डॉ. संजय तिरथकर, ॲड. प्रशांत देशपांडे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सफाई कामगारांना राखी बांधून संविधान मूल्यांचा संदेश

### 'आम्ही भारताचे लोक' उपक्रमातून स्वच्छता कामगारांचा सन्मान

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**अमरावती:** रक्षाबंधनाच्या निमित्ताने शहरातील सफाई कामगार बांधवांना राखी बांधून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. 'आम्ही भारताचे लोक' या उपक्रमांतर्गत संविधान जागर अभियान अमरावतीसह विविध सामाजिक संघटना व महिला बचत गटांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

अमरावती शहरातील नवसारी, दस्तूर नगर, फरशी स्टॉप, मिल चाळ, पंचशील नगर, रमाबाई आंबेडकर नगर, मातापैल तसेच बडनेरा परिसरातील सफाई कामगारांशी कार्यकर्त्यांनी संवाद साधत त्यांना राखी बांधली. शहराची स्वच्छता राखण्यासाठी दररोज काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या श्रमाबद्दल यावेळी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमात जात, धर्म व पंथाच्या पलीकडे जाऊन संविधानातील समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही मूल्ये आचरणात आणण्याचा संदेश देण्यात आला. रक्षाबंधन केवळ कौटुंबिक नात्यापुरते मर्यादित न ठेवता समाजातील कष्टकरी घटकांशी आपुलकीचे व माणुसकीचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान सफाई कामगार व नागरिकांशी संवाद साधून संविधानाबाबत जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच व्यसनमुक्ती याबाबत माहिती देण्यात आली. अंधश्रद्धांना बळी न पडता विवेकवादी व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आणि व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन संविधान जागर अभियान अमरावती, क्रांती नवनिर्मिती राष्ट्रीय संघटन, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती, महिला राजसत्ता आंदोलन, जनसेवा वस्ती स्तर संघ, संकल्प वस्ती स्तर संघ, बुद्धछाया वस्ती स्तर संघ आणि महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

यावेळी साथी विजय डवरे, प्रफुल्ल मंदा श्रीधर, किरण दुपारे, सीमा मडामे, उषा कोठार, नंदा गुप्ता, वर्षा पकडे, नूतन वासनिक, निलू मेश्राम, अनुपमा गोंडाने, कुंदा मेश्राम, वैशाली राऊळ, सुरेखा तायडे, रंजना भजगवरे, प्रतिभा खापरे, दिलीप लाडे, आशिष देशमुख यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## खरीप पीकस्पर्धेत सहभागी व्हावे

**कृषी विभागाचे आवाहन**

**वाशीम :** राज्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक व अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून पीक उत्पादकता वाढवावी, प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ परिसरातील इतर शेतकऱ्यांना व्हावा, या उद्देशाने दरवर्षी राज्यांतर्गत पीकस्पर्धा आयोजित करण्यात येते. खरीप हंगाम २०२६ साठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांची पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. यापूर्वी पीकस्पर्धेची प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने राबविण्यात येत होती. प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी खरीप हंगाम २०२६ पासून पीकस्पर्धेचे अर्ज स्वीकारण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन संगणक प्रणाली सुरू करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरही 'पिक स्पर्धा नोंदणी' सुविधा उपलब्ध आहे.

# जिल्ह्यात नदीपात्रातून अवैध रेती उत्खनन !

## *शासनाचे उत्पन्न बुडवून वाढीव दराने रेतीचा पुरवठा * घरकूलासाठी रेती मिळेना

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात रेती घाटाचे लिलाव झालेले नाही. बांधकाम करणाऱ्यांना छुप्या मार्गाने वाढीव दराने रेतीचा पुरवठा केल्या जात आहे. जिल्ह्यात रेतीचे अवैध उत्खनन करून वाहतुक करणारे रेती माफीया शासनाचे उत्पन्न बुडवित असल्याचे दिसून येते. मात्र घरकूलसाठी रेती मिळत नसल्यामुळे घरकूले बांधकाम रखडले आहे. दुसरीकडे रेती तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. रेती तस्कऱ्यांनी नदीपात्रात ट्रक्टर उतरविण्यासाठी छुप्या मार्गाने रस्ते तयार केले आहेत. याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.





जिल्ह्यात पैनगंगा नदीपात्रासह इतर छोट्या मोठ्या नदी नाल्यातून रेतीचे अवैध उत्खनन राजरोसपणे सुरू आहे. हे उत्खनन स्थानिक तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार व पोलिसांसमोर होत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात रेती घाटाचे लिलाव झालेले नाही. बांधकाम करणाऱ्यांना छुप्या मार्गाने वाढीव दराने रेतीचा पुरवठा केल्या जात आहे. जिल्ह्यात रेतीचे अवैध उत्खनन करून वाहतुक करणारे रेती माफिया शासनाचे उत्पन्न बुडवित असल्याचे दिसून येत आहे. रेती तस्कऱ्यांनी नदीपात्रारात ट्रक्टर उतरविण्यासाठी रस्ते तयार केले आहेत. अवैध रेतीचासाठी करून दामदुप्पट भावाने विकत असतात.

नदीपात्रातून हजारो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन चोरी सर्रासपणे सुरू आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी बिना क्रमांकाच्या ट्रक्टर व ट्रॉलीने ही वाहतुक केली जात आहे. विशेष म्हणजे परिसरातील खासगी व शासकीय बांधकामांनाही अधिकारी व पोलिसांच्या समोर रेतीचा पुरवठा केल्या जात आहे. नदी घाट म्हणजे रेती माफियांसाठी तस्करांचे कुरन बनले आहे. जिल्ह्यात रेती माफियांची मोठी टोळी असून अधिकाऱ्यांच्या संगणमतानेच हा व्यवसाय सुरू आहे. सर्व प्रमुख मार्गावरून रेतीची वाहतुक सुरू असून अधिकारी फक्त बघ्याची भूमीका घेत आहे. दुसरीकडे सर्व सामान्यांच्या घरकुलासाठी व शौचालयासाठी रेती उपलब्ध होत नसल्याने घरकुलाचे काम अपुर्ण राहीले आहे.

### दोन अधिकाऱ्यांवर झाले हल्ले

मे २०२१ मध्ये रिसोड तालुक्यातील अवैध रेती वाहतुकीवर कारवाईसाठी गेलेल्या तहसीलदार व तलाठी यांच्यावर रेती माफीयांनी हल्ला केला तर कारंजा येथे कारंजा येथील अधिकाऱ्यांवर रेती माफीयांनी धक्का बुक्की केली.

त्यामुळे अधिकारी दहशती मध्ये आहे. यासाठी जिल्ह्यातील अवैध रेती वाहतूक बंद करुन त्याच्यावर कारवाई करण्याची मागणीचे वृत्त सिटीन्यूज़ सुपरफास्टने प्रकाशित केले होते या वृत्ताची दखल घेऊन पोलिसांनी कारवाई केली होती. आता काही महिन्यानंतर पुन्हा वाळुमाफियांनी पुन्हा अवैध रेती उपसा सुरू केला आहे. त्यामुळे हा उपसा बंद करावा अशी मागणी होत आहे.




## थोडक्यात

### काँग्रेसच्या शहर अध्यक्षपदी सैय्यद आझम

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



शहर काँग्रेस कमेटीचे निष्ठावंत कार्यकर्ते सय्यद आझम सय्यद सादिक यांची काँग्रेसच्या शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीचे श्रेय त्यांनी काँग्रेसचे महासचिव ॲड. दिलीप सरनाईक, सचिव जावेद सौदागर, जिल्हाध्यक्ष राजूभाऊ चौधरी, तालुका अध्यक्ष दिलीप मोहनावाले, माजी जि. प सभापती रमेश शिंदे, ॲड. प्रकाश इंगोले यांना दिले आहे. शहरात काँग्रेस पक्षाची ताकद वाढवून संघटन अजून मजबूत करण्यासाठी येत्या काळात आपण प्रयत्न करणार असल्याचे सैय्यद आझम यांनी सांगितले.

# करडा फिडरवर अतिरीक्त भार; वारंवार जळतेय विद्युत तार !

## गावातील वीजपुरवठा ठप्प * पाठपुरावा करूनही अधिकारी गप्प

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील करडा येथील पिडरवर पाच गावांचा अतिरीक्त भार असल्याने वीजपुरवठा खंडीत होणे, विद्युत तार जळणे, रोहित्रात बिघाड, आदी प्रकार घडत असल्याने ग्रामस्थ वैतागले आहेत. याकडे महावितरणने लक्ष द्यावे, अन्यथा गावकऱ्यांसह महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. कारण अनेक वेळा निवेदने व तक्रारी करून नागरिकांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. तरी सुध्दा भ्रष्टअधिकाऱ्यांना खंत नसल्याने नागरिकांना आता आंदोलनाचा मार्ग पत्कारावा लागत आहे.

गेल्या पाच वर्षापासून करडा फिडरवर पाच गावांचा अतिरीक्त भार असल्यामुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत आहे. विद्युत तार केबल जळणे, घरातील उपकरणे जळणे, रोहित्रामध्ये बिघाड होत आहे. सदैव संकटात असलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी विजेची आवश्यकता आहे. मात्र वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे.



### सहनशिलतेचा संपला अंत, भ्रष्टअधिकाऱ्यांना नाही खंत...

**उन्हाळाभर विजेचा लपंडाव सुरूच होता आता तर, पावसाळा लागल्याने पाऊस येण्याअगोदरच विज पुरवठा बंद होतो. अनेक दिवस नागरिकांना अंधारातच राहावे लागते. निवेदने, तक्रारी देवून नागरिकांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. तरी सुध्दा भ्रष्ट अधिकाऱ्यांना त्यांची खंत नाही.**

याकडे महावितरणच्या अभियंत्यांनी येत्या दोन दिवसात लक्ष देऊन यशस्वी तोडगा काढावा, अन्यथा महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर गावकऱ्यांसह आंदोलन छेडण्याचा दिला आहे.

### विद्युत खांब वाकले, महावितरण झोपले

करडा गावातील काही विद्युत खांब वाकल्याने तसेच जीवंत विद्युत तार लोबकळल्या असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. वीज देयक वसुलीसाठी तत्परता दाखविणाऱ्या महावितरणच्या अभियंत्यांनी विद्युत सेवा पुरविण्यातही तेवढीच तत्परता दाखवावी. असा सूर करडावासीयांमधून उमटत आहे. वीज खांब पडल्याने किंवा लोंबकळलेल्यार विद्युत तारेला कोणाचा स्पर्श झाल्याने जीवितहानी झाली तर या जबाबदार कोण? असा प्रश्न सरपंच गंगाताई देशमुख यांनी उपस्थित केला.

# नाईलाजाने करावा लागतो विनातिकीट प्रवास

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



येथील रेल्वेस्थानकावरुन गत काही महिण्यांपासुन लांब पल्याच्या गाड्या सुरू झाल्या आहेत. तथापी रेलवेने ये-जा करणाऱ्यां प्रवाशांची संख्या वाढली आहे. मात्र रेल्वेस्थानकावर तिकीट काढण्यासाठी एकच खिडकी असल्याने अनेक प्रवाशांना रांगेत लागल्यानंतर गाडी येईपर्यंत तिकीटच मिळत नसल्याने नाईलाजाने अनेक प्रवाशांना विनातिकीट प्रवास करावा लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

पूर्वी नॅरोगेज असलेल्या पूर्णा - अकोला मार्गाचे ब्रॉडगेज मध्ये रुपांतर झाल्यानंतर बऱ्याच रेल्वेगाड्या या मार्गावर सुरू झाल्या आहेत. गत काही महिण्यांपासून लांब पल्याच्या रेल्वे गाड्या या मार्गावर सुरू झाल्यामुळे वाशीम जिल्ह्यातील प्रवाशांना विविध ठिकाणी प्रवास करणे सोयीचे झाले आहे. या मार्गावर अकोला, तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी सकाळी दहा वाजेदरम्यान रेल्वे गाड्या असल्यामुळे अकोला तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी शेकडो प्रवासी रेल्वेस्थानकावर गर्दी करतात. रेल्वे येण्याच्या काही कालावधी आधी रेल्वेची तिकीट विक्री सुरू होते. आणि प्रवाशांची संख्या जास्त असल्याने काही प्रवाशांनाच रांगेत लागल्यानंतर तिकीट मिळते. रांगेत असतांना रेल्वेगाडीचे आगमन झाल्यानंतर अनेक प्रवासी रेल्वे तिकीट खरेदीच्या रांगेतून तिकीट न काढताच रेल्वेत चढतात. तिकीट न मिळाल्याने नाईलाजाने त्यांना विनातिकीट प्रवास करावा लागतो. यामुळे रेल्वे प्रशासनाचे मोठे नुकसान होत आहे.

तर विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाईलाजाने तिकीट कलेक्टरच्या कारवाईला सामोरे जावे लागत आहे. या रेल्वेस्थानकावर एकच तिकीट खिडकी असल्याने वाढलेल्या प्रवाशांची संख्या पाहता व प्रवाशांची होणारी अडचण दुर करण्यासाठी रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य नितीन पगार, व्यापारी मंडळाचे जुगलकिशोर कोठारी, व विविध सामाजिक संघटनांनी अनेक वेळा संबंधितांकडे मागणी केली आहे. मात्र अद्यापही या मागणीची रेल्वे विभागाने दखल न घेतल्याने रेल्वे स्थानकावर एकाच खिडकीतून आरक्षित तथा इतर तिकीटांची खरेदी करावी लागत आहे. तथापी रेल्वे प्रशासनाचे नुकसान टाळण्यासाठी व प्रवाशांची अडचण दुर करण्यासाठी रेल्वे स्थानकावर तिकीट खिडकी वाढविण्याची मागणी सर्वस्तरातून होत आहे.

## भ्रष्टाचाराची चतुःसूत्री,

# वृक्षलागवड कागदोपत्री !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वन विभागासह विविध विभागाच्या वतीने वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. जिल्ह्यात ग्रामपंचायतीसह विविध कार्यालयात वृक्षारोपण करण्यासाठी लाखो रुपयाचा निधी उपलब्ध होतो. मात्र निधी पूर्ण आपसात लाटून व कागदोपत्री वृक्षारोपण दाखवून शासनाच्या विविध प्रकारच्या कार्यालयामध्ये निधी लाटण्याचा प्रकार बहुतांश ठिकाणी घडला असुन वृक्षलागवडीतली झाडे मेलीत मा० सबंधीत निधी खिशात घालुन अधिकारी मा० जगलेत हेच चिञ सध्या पाहावयास मिळत आहे. तसेच तालुक्यात वृक्षारोपण फक्त कागदावरच दाखवले गेल्याचा प्रकारही झाल्याने याप्रकरणी चौकशी गरजेची असल्याची मागणी जोर धरत आहे. शासनाच्या वतीने शेतकोटी वृक्षलागवड योजना दरवर्षी राबविण्यात येते. त्यापैकी ५० ते ६० टक्केच रोपाची लागवड केली जाते. उर्वरित लागवड कागदोपत्री दाखवून निधी हडप केल्या जातो. अनेक जिल्ह्यात पावसाळा संपल्यानंतर वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. या योजनेत खासगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी आणि स्वयंमसेवी संस्थांच्या सहाय्याने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम पुर्ण करणे अपेक्षीत आहे. मात्र दरवर्षी शेकडो कोटी वृक्षलागवड होवूनही पुन्हा पुन्हा वृक्षलागवड योजना राबविली जाते. ही बाब म्हणजेच वृक्षलागवड योजना फक्त कागदोपत्रीच होत असल्याचे सिध्द होते. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. शुद्ध ऑक्सिजन, उन्हाळ्यात जनावरांना , माणसांना, व इतर पशुपक्ष्यांना सावली हवी आहे व ती काळाची सर्वांना गरज आहे. जर अधिकारी जबाबदारी घेत नसेल तर एकच लक्ष्य दोन कोटी वृक्ष महत्त्वाकांक्षी उपक्रमाला मुठमाती देऊन वृक्ष लागवडीत 'गोलमाल' करुन ही लागवड सुरू असल्याचा प्रकार होताना दिसत आहे.

### अधिकारी जगलेत, झाडे मात्र मेली....



#### रोपवाटीकेतले वृक्ष गायब !

वनविभाग व जलसंपदा विभागामार्फत रापवाटीका योजना राबविण्यात येतात. मात्र या रोपवाटिकेतच वृक्ष नसल्यामुळे वृक्ष लागवड योजना कशी राबविणार असा प्रश्न पडला आहे. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

# सेंद्रीय शेतीला बाजारपेठ निर्माण करून उत्पादन वाढवा - राजेंद्र पवार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता कृषि विज्ञान केंद्र बारामती येथील सर्वेसर्वा असलेले राजेंद्र पवार यांची विशेष उपस्थितीलाभली. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत प्रमाणपत्राचे वाटप केले.

कृषी विभाग व तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फार्मर ग्रूप लीगच्या विजेत्या शेतकरी गटांना राज्य अंतर्गत प्रशिक्षण दौऱ्यानिमित्त बारामती येथील कृषी विज्ञान केंद्र येथे तीन दिवसीय वेगवेगळ्या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. ज्यामध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय, गांडूळ खत





निर्मिती, सेंद्रिय शेती, सेंद्रिय निष्ठा निर्मिती, शेळीपालन, कुक्कुटपालन, माती विना शेती, फळ व भाजीपाला व्यवस्थापन, मधुमक्षिका पालन, एकात्मिक शेती, सूक्ष्म सिंचन फर्टिगेशन, बीज प्रक्रिया केंद्र व बियाणे निर्मिती, जैविक खते व औषधे निर्मिती, जैविक किड नियंत्रण, कृषी सल्ला उत्पादन, शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना, उत्पादनाचे विपणन, ब्रॅण्डिंग आणि पॅकेजिंग, प्रात्यक्षिके व शिवार फेरी, होमिओपॅथी तंत्रज्ञान व शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यावर आधारित नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश होता. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा समूह या तीन दिवशी प्रशिक्षणाकरता बारामतीत दाखल झाला होता. या दरम्यान बारामती कृषी विज्ञान केंद्रातील नाविन्यपूर्ण बाबींचा सखोल अभ्यास करून माहिती घेत प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले. येत्या काळात येथे झालेल्या प्रशिक्षणाचा जिल्ह्यातील सर्व प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना नक्की त्यांच्या शेतीचे अर्थकारण सुधारण्याकरिता मदत होईल असा ठाम विश्वास बारामती येथील गणेश शिंदे यांनी व्यक्त केला. व भविष्यातही अशा प्रशिक्षण दौऱ्यावर शेतकऱ्यांना बाहेरच्या शेतीचे ज्ञान देऊन त्यांच्या प्रगती साधता येईल व ते करण्याकरिता कृषी व आत्मा विभाग सदैव तत्पर असेल असे आश्वासन जिल्हा समन्वयक तथा तंत्रज्ञान व्यवस्थापक अधिकारी जयप्रकाश लव्हाळे यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्ह्यातील एस लांडे, नितीन मोरे, रुपाली ठाकरे, उषा देशमुख, रेणुका धांडे, राजेंद्र देशमुख, रामदास सोलनोर, शंकर राऊत, अजिंक्य मेडशीकर यांच्या सह जिल्ह्यातील शेतकरी व कृषी विभागातील कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मालेगांव तालुका उमेदच्या ग्रामसखींची पुकारले...

# ऑनलाईन काम बंद आंदोलन



● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

मालेगांव पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना निवेदनद्वारे उमेद अभियाना अंतर्गत गाव व प्रभाग स्तरावर कार्यरत ग्रामसखी तसेच कॅडरच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उमेद महिला व कल्याणकारी संघटनेने २४ ऑगस्ट २०२६ पासून ऑनलाईन काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.

मागण्यांची पूर्तता होईपर्यंत ग्रामसखी गावपातळीवरील आवश्यक भौतिक कामे सुरू ठेवतील, परंतु ऑनलाईन कामे न करण्यांची भूमिका संघटनेने घेतली आहे. तसेच लेखी निवेदन मालेगांव येथील गटविकास अधिकारी यांना दि. २७ ऑगस्ट रोजी देण्यात आले. राज्य संघटनेमार्फत मागील महिन्यापासून जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक आणि गटविकास अधिकारी यांना निवेदने देण्यात आली आहेत.

# लघुउद्योगांच्या विस्ताराला सुविधांचा ‘ब्रेक’

## जिल्ह्यात 19,872 उद्योग-उपक्रमांची नोंद; 54 हजारांवर रोजगारनिर्मिती, खामगाव तालुका आघाडीवर

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**बुलढाणा:** कापूस, सोयाबीन, डाळी आणि फळपिकांच्या रूपाने कच्चा माल मुबलक असतानाही बुलढाणा जिल्ह्यातील लघुउद्योगांच्या विस्ताराला मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत आहे. अखंड वीज, पुरेसे पाणी, विकसित औद्योगिक भूखंड आणि सक्षम वाहतूक व्यवस्था उपलब्ध नसल्याने जिल्ह्याचा औद्योगिक विकास प्रामुख्याने खामगाव, चिखली आणि मलकापूर परिसरातच केंद्रित झाला आहे.

### एमआयडीसीही मोजक्या केंद्रांत

» जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रात ५४१ प्रकल्प आणि सुमारे ६,२३४ रोजगार नोंदविले आहेत. यापैकी खामगावमध्ये २८९, चिखलीत १४९ आणि मलकापूरमध्ये ७२ प्रकल्प आहेत. बुलढाण्यात १३, देऊळगाव राजात आठ, संग्रामपूरमध्ये सहा आणि मेहकरमध्ये चार प्रकल्प आहेत.




जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचनातील मार्च २०२४ अखेरच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात १९ हजार ८७२ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची नोंद आहे.या उपक्रमांमध्ये ५४ हजार ७७० रोजगार नोंदविण्यात आले असून, एकूण गुंतवणूक सुमारे ८११ कोटी रुपये आहे.

कापूस हे जिल्ह्याचे ‘एक जिल्हा-एक उत्पादन’ अंतर्गत प्रमुख उत्पादन आहे. जिल्ह्यात जिनिंग-प्रेसिंग उद्योग असले तरी सूत, कापड आणि तयार वस्त्रांपर्यंतची मूल्यसाखळी विकसित झालेली नाही. परिणामी कच्चा कापूस आणि गाठी जिल्ह्याबाहेर जातात; त्यावरील प्रक्रिया आणि रोजगाराचा मोठा वाटाही बाहेरच निर्माण होतो.

# माय-लेकीच्या मृत्यूप्रकरणी वाहन चालकावर गुन्हा

## भरधाव वाहनाने दुचाकीला दिली होती धडक; दोघे गंभीर

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**संग्रामपूर :** टूनकी-लाडणापूर रस्त्यावर भरधाव चारचाकी प्रवासी वाहन चालवून दुचाकीला जोरदार धडक दिल्याप्रकरणी चालकाविरुद्ध सोनाळा पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी दुपारी झालेल्या या भीषण अपघातात आईसह एक वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाला, तर तीन वर्षांचा मुलगा आणि अन्य एक जण गंभीर जखमी झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टूनकी-लाडणापूर रस्त्याचे काम सुरू असतानाही चारचाकी वाहन चालक रवी गोखले हा एमपी १२ झेडएच ९३४२ क्रमांकाचे वाहन भरधाव चालवत होता. त्याने विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात दुचाकीवरील उर्मी ऊर्फ पूर्वी संजय वास्कले (वय १) आणि तिची आई सपना संजय वास्कले (रा. जसौदी, ता. शाहपूर, जि. बऱ्हाणपूर, मध्य प्रदेश) यांचा मृत्यू झाला. अपघातात सनवीर संजय वास्कले (वय ३, रा. जसौदी) आणि कमलेश भुरा चंगळ बोरया (रा. तेल्हारा, जि. अकोला) हे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी हिरालाल अनारसिंग वास्कले (रा. उसरा, ता. जळगाव जामोद) यांनी सोनाळा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून चालक रवी गोखले याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५, ११० अन्वये गुन्हा दाखल केला.

**रक्षाबंधनासाठी माहेरी जाताना काळाचा घाला**

रक्षाबंधनाच्या दिवशीच बहीण आणि भाचीवर काळाने घाला घातल्याने वास्कले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. रक्षाबंधनानिमित्त बहीण, तिचा मुलगा, मुलगी आणि भाची भावासोबत दुचाकीने माहेरी बोरवा (ता. तेल्हारा) येथे जात होते. टूनकी-लाडणापूर रस्त्यावर समोरून आलेल्या चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत सपना वास्कले आणि तिची चिमुकली भाची उर्मी ऊर्फ पूर्वी यांचा मृत्यू झाला. तर भाऊ आणि भाचा गंभीर जखमी झाले.

# पोलिसी रुबाबात तोतयांचा ‘तपास’, महिलेलाही लुटले!

## महामार्गावर दुचाकीस्वाराला अडविले; तक्रार नाही

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**सिंदखेड राजा :** पोलिस असल्याचा आव आणत साध्या वेशातील दोन तोतयांनी महामार्गावर दुचाकीस्वाराला अडवून झडती घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी (दि. २९) सकाळी काळापाणी शिवारात घडली. त्यानंतर याच दोघांनी किनगाव राजाजवळ एका महिलेला लुटल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, संबंधित महिला अद्याप तक्रार देण्यासाठी पुढे न आल्याने गुन्हा दाखल झालेला नाही. पोलिसांनी घटनेला दुजोरा देत सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला आहे.

सुलजगाव येथील रहिवासी तथा माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे स्वीय सहायक शिवाजी किंगरे हे सकाळी सिंदखेड राजाकडे येत होते. काळापाणी शिवारात दोन व्यक्तींनी त्यांना अडविले. गांजा व अमली पदार्थांची तस्करी वाढल्याने तपासणी सुरू असल्याचे सांगत त्यांनी कथित ओळखपत्र दाखविले.मात्र, त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने किंगरे यांनी सावधपणे उत्तरे दिली.

**‘पोलिस ठाण्यात चला!’**

तोतयांपैकी एकाने किंगरे यांच्या कॉलरला हात घातल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. तपासणीच करायची असेल तर थेट पोलिस ठाण्यात चला, असे आव्हान देताच दोघांचा रुबाब उतरला.

लक्ष विचलित करण्यासाठी संशयितांनी मागून येणाऱ्या अन्य व्यक्तीलाही थांबविले. त्यानंतर पुन्हा किंगरे यांच्याकडे मोर्चा वळविला; मात्र पोलिस ठाण्यात जाण्याचे सांगताच दोघांनी किनगाव राजाच्या दिशेने पलायन केले. किंगरे यांनी स्थानिक मित्र आणि पोलिसांना माहिती दिली; परंतु संशयित हाती लागले नाहीत.

**महिलेला लुटल्याची माहिती**

यानंतर किनगाव राजाजवळील पेट्रोल पंपाच्या वळणावर मुलासोबत जाणाऱ्या महिलेला याच दोघांनी अडवून तिच्याजवळील ऐवज लुटल्याची माहिती मिळाली. पोलिसांकडे मात्र अद्याप औपचारिक तक्रार आलेली नाही. संशयित दुसरबीडच्या दिशेने गेल्याची शक्यता आहे. किनगाव राजा बसस्थानकासह मार्गावरील सीसीटीव्ही चित्रण तपासले जात असल्याचे ठाणेदार मातोंडकर यांनी सांगितले. सध्या या तोतयांचा पोलिस शोध घेत आहेत.

# मेरा बु. येथील विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**मेरा बु. :** येथील तब्बल नऊ विद्यार्थ्यांनी आयएएस, बँकिंग, शिक्षण क्षेत्रासह विविध क्षेत्रांत उत्तुंग भरारी घेतल्याने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाची कास सोडू नये आणि ध्येय गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, याचा आदर्श या विद्यार्थ्यांनी इतर युवकांसमोर निर्माण केला आहे. मेरा बु. गावातील शुभम त्र्यंबक डोंगरदिवे यांनी आयएएसमध्ये उतुंग भरारी घेत गुजरात येथे उल्लेखनीय यश मिळविले आहे. समाधान लक्ष्मण वायाळ यांनी बँकिंग क्षेत्रात पुणे येथे आपले स्थान निर्माण केले आहे. तसेच अश्विनी रवींद्र गिरी गोंदिया, पूजा महेश पडघान धुळे, मनीषा अनिल पडघान नाशिक, अक्षय दिलीप पंचाळ अमरावती, राजू शंकर जयस्वाल ठाणे, भागवत लिंबाजी पडघान गोंदिया, तर आकाश विजय पडघान यांनी वाशीम येथे विविध क्षेत्रांत यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदांवर पोहोचणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश गावातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, 'मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी स्वप्ने साकार करू शकतात,' हा संदेश या यशातून अधोरेखित झाला आहे.

# जुन्या वादातून तरुणासह आई-वडिलांना मारहाण

## खामगावातील घटना; आरोपीवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**खामगाव:** बायपास रोडवरील वाय पॉईट परिसरात जुन्या वादातून एका तरुणासह त्याच्या आई-वडिलांना काठीने मारहाण केल्याची घटना २८ ऑगस्ट रोजी रात्री घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महादेव भानुदास लोखंडे (५६, रा. सजनपुरी, खामगाव) यांनी याप्रकरणी तक्रार दिली. तक्रारीनुसार, आरोपी राजू हिरा भगतपुरे (४२, रा. सजनपुरी, खामगाव) हा लोखंडे यांच्या दुकानात आला होता. ‘तुम्ही काल माझ्याबाबत कोणाकडे शिवीगाळ केली, हे मला समजले आहे,’ असे म्हणत तो तेथून निघून गेला. त्यानंतर लोखंडे यांचा मुलगा बायपास रोडने जात असताना आरोपीने दुकानातून काठी आणून त्याला अडविले. ‘तुझ्या वडिलांनी माझी बदनामी का केली?’ असे म्हणत त्याला मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

मुलाला मारहाण होत असल्याचे पाहून लोखंडे व त्यांची पत्नी भांडण सोडविण्यासाठी गेले असता आरोपीने त्यांनाही हातावर काठीने मारहाण केली. तसेच शिवीगाळ केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये आरोपी राजू हिरा भगतपुरे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस अंमलदार सूरज राठोड करीत आहेत.

# धोत्राभनगोजी परिसरात पावसाची दडी; पिके कोमजली

## निसर्गाच्या लहरीपणाने शेतकरी हतबल; बळीराजाची नजर आभाळाकडे

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**धोत्राभनगोजीः :** गेल्या २० दिवसांपासून पावसाने अचानक दडी मारल्यामुळे धोत्रा भिनगोजी व परिसर भागातील शेतकरी अत्यंत संकटात सापडला आहे. सर्व हवामान अंदाज खोटे ठरवत निसर्गाने पुन्हा एकदा बळीराजावर मोठा आघात केला आहे. सध्या सोयाबीनचे पीक फुलांमधून नुकतेच कळ्यांवर येत असून च्या नाजूक टप्प्यावर पिकाला पाण्याची नितांत गरज आहे. मात्र, पावसाने ऐन मोक्याच्या वेळी डोळे वटारल्यामुळे उभी पिके कोमेजण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत सापडले आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या जवळील संपूर्ण मायपुंजी पणाला लावून खते, बियाणे, तणनाशक फवारणी आणि निंदणी असा प्रचंड खर्च केला होता. आगामी महिन्यात पीक बहरात येईल आणि कष्टाचे फळ मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. परंतु, पावसाच्या प्रदीर्घ विश्रांतीमुळे शेतकरी पुरता हतबल झाला आहे. शेतीच्या बिकट परिस्थितीमुळे स्थानिक बाजारपेठेवरही मोठा परिणाम झाला असून व्यापार मंदावला आहे. सावकारी आणि उसनवारीचे देणे-घेण्याचे व्यवहारही पूर्णपणे ठप्प पडले आहेत. त्यामुळे येणारा काळ नेमके काय घेऊन येईल, या चिंतेने शेतकऱ्यांची झोप उडवली आहे. येत्या आठवड्यात जर दमदार पाऊस झाला नाही, तर हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाऊन पिके पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांचे संपूर्ण अर्थकारण आणि भवितव्य हे प्रामुख्याने सोयाबीन व तूर या पिकावर अवलंबून असते. सुरुवातीला पावसाने समाधानकारक साथ दिली, परंतु पिके ऐन बहरात असताना पावसाने दांडी मारल्याने परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे.

थोड्या-मोड्या स्वरूपात का होईना, पीक घरात यावे आणि कुटुंबाला आधार मिळावा, यासाठी शेतकरी रोज आशेने आभाळाकडे डोळे लावून बसले आहेत. निसर्गाने कृपा करून लवकरात लवकर पावसाची बरसात करावी, अशी आर्त साद आता धोत्राभनगोजी परिसरातील बळीराजा घालत आहे.

# बसस्थानकात वृद्धेची सोन्याची पोथ लंपास

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**शेगाव:** बसस्थानकातील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने वृद्ध महिलेच्या पर्सची चैन उघडून अडीच तोळे वजनाची सोन्याची पोत लंपास केल्याची घटना २९ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. या प्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नर्मदा चिंतामन बावणे (६५, रा. भोनगाव) या २९ ऑगस्ट रोजी दपारी २ ताजताच्या सुमारास शेगाव ते चिचखेड बसने भोनगाव येथे जाण्यासाठी शेगाव बसस्थानकात आल्या होत्या. बसमध्ये मोठी गर्दी असल्याने त्या बसमध्ये चढून सीटवर जाऊन बसल्या. काही वेळाने त्यांच्या मोठ्या पर्सची चैन अर्धवट उघडी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

पर्समध्ये ठेवलेले छोटे पाकिटही गायब असल्याचे आढळले. या पाकिटात पांढऱ्या रुमालात बांधलेली जुनी वापरातील सोन्याची पोत व सोन्याचे पेंरण होते अडीच तोळे वजनाच्या या सोन्याच्या ऐवजाची अंदाजे किंमत ६८ हजार ८०० रुपये आहे.

गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने पर्सची चैन उघडून पाकिट व त्यातील सोन्याचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी नर्मदा बावणे यांच्या फिर्यादीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस अंमलदार श्याम अघात करीत आहेत.

# विषप्राशनामुळे चाळीस वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**मलकापूर :** तालुक्यातील विवरा येथील ४० वर्षीय व्यक्तीचा विषप्राशन केल्यामुळे मृत्यू झाल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उघडकीस आली.

तालुक्यातील विवरा येथील रहिवासी गजानन नामदेव सांगळकर (वय ४०) यांना त्यांच्या नातेवाईकांनी २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी उपचारासाठी मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केली असता संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. याबाबत उपजिल्हा रुग्णालयाकडून मलकापूर शहर पोलिसांना लेखी मेमो प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी कायमी मर्ग क्रमांक ५०/२०२६, कलम १९४ बीएनएसएस अन्वये नोंद केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक निंबोळकर करीत आहेत.

# वडीजवळ भरधाव कारची दुचाकीला धडक; दोघे जखमी

## वडी येथील घटना; चालकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी 30 ऑगस्ट

**नांदुरा :** तालुक्यातील वडी येथील महामार्गावरील पुलावर भरधाव व निष्काळजीपणे कार चालवून दुचाकीला धडक दिल्याने दोघे जखमी झाल्याची घटना २१ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी २८ ऑगस्ट रोजी कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुषार पदमाकर पाटील (वय ३०, रा. दुधलगाव बु, ता. मलकापूर) हे मित्र अनंता प्रल्हाद पाटील यांच्यासोबत मोटारसायकलने नांदुऱ्याहून मलकापूर मार्गे दुधलगावकडे जात होते. वडी येथील महामार्गावरील पुलावर समोरून येणाऱ्या कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात तुषार पाटील व अनंता पाटील दोघेही जखमी झाले असून, दुचाकीचेही नुकसान झाले.

कार चालक पप्पू उर्फ जयशन रामराव वाकोडे (रा. पिंपळखुटा धांडे, ता. नांदुरा) याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीवरून नांदुरा पोलिसांनी वाकोडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १२५ (ब), ३२४ (४) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# आता सप्टेंबरच्या पावसावर खरीप-रब्बी हंगामाचे भवितव्य

## ‘एल निनो’ अधिक तीव्र होण्याचे संकेत, पाऊस कमी

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**बुलढाणा :** जुलैच्या पावसाने खरीप पिकांना सावरले; मात्र त्यानंतर वाढलेल्या पावसाच्या खंडामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची चिंता कायम आहे. आता सोयाबीनला शेंगा लागण्याचा, कपाशीला पात्या-फुले येण्याचा आणि तुरीच्या वाढीचा महत्त्वाचा टप्पा असल्याने सप्टेंबरमधील पाऊस खरीप उत्पादनाची दिशा ठरविणार आहे. त्यामुळे हवामान विभागाच्या सप्टेंबरच्या दीर्घकालीन अंदाजाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

२९ ऑगस्टच्या अहवालानुसार, यंदा जिल्ह्यात सरासरी ४३७मिलिमीटर पाऊस झाला. गतवर्षी याच तारखेपर्यंत सरासरी ४८९ मिलिमीटर पाऊस नोंदला होता. म्हणजे यंदाचा १०.६ पाऊस गतवर्षीपेक्षा ५२ मिलिमीटर किंवा टक्क्यांनी कमी आहे. तालुकानिहाय तफावतही मोठी असून, पावसाचे असमान वितरण पिकांसाठी अधिक चिंताजनक ठरत आहे.

जिल्ह्यात ७ लाख २५ हजार २२९ हेक्टरवर, म्हणजे सरासरीच्या ९८.३९ टक्के क्षेत्रावर खरीप पेरणी झाली आहे. सप्टेंबरमध्येही खंड कायम राहिल्यास सोयाबीनच्या शेंगा भरणे आणि दाण्याचा आकार यावर परिणाम होऊ शकतो. कपाशीची पात्या-फुले गळणे, तुरीची वाढ खुंटणे आणि हलक्या जमिनीतील पिके करपण्याचा धोका आहे. परिणामी खरीप उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**‘एल निनो’चा तीव्रता वाढली**

प्रशांत महासागरातील ‘एल निनो’ स्थिती अधिक तीव्र होत आहे. आगामी काळात एल निनो अधिक तीव्र होण्याची शक्यता २० टक्क्यापेक्षा अधिक वर्तवली जात असल्याचे जिल्हा कृषी विज्ञान केंद्रातील हवामान तज्ज्ञ मनेश यदुलवार यांनी सांगितले. परिणामी त्याचा प्रभाव २०२७च्या प्रारंभापर्यंत राहू शकतो.

कृषी विभागाने कोळपणी, आच्छादन, तणनियंत्रण तसेच उपलब्ध पाण्याचा ठिबक किंवा तुषार पद्धतीने संरक्षित सिंचनासाठी वापर करण्याचे आवाहन केले आहे. तज्ज्ञांच्या सल्ल्याने फवारणी करावी, असे स्पष्ट केले आहे.

**प्रकल्पांत ६१ टक्के साठा**

जिल्ह्यातील प्रकल्पांत सध्या २८३.७९ दलघमी, अर्थात ६१.०६ टक्के उपयुक्त जलसाठा आहे. साधारणतः ३५ टक्क्यांच्या आसपास साठा असल्यास पिण्याचे आरक्षण आणि अन्य गरजा वजा करून उपलब्ध पाण्यानुसार एखाद-दुसरे संरक्षित सिंचन आवर्तन विचारात घेतले जाऊ शकते. हा हमखास नियम नसून निर्णय प्रकल्पनिहाय पाणी उपलब्धतेवर होतो. जिल्ह्यात दरवर्षी सुमारे ४३ ते ४४ दलघमी पाणी पिण्यासाठी राखीव ठेवले जाते. त्यामुळे पाणी आरक्षण समितीची बैठक घेऊन रब्बीसाठी संभाव्य आवर्तनाचे नियोजन करण्याची गरज आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
८
रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# भेंडवळच भाकीत... जग झालं चकित!

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोला:** जग भलेही कितीही तांत्रिकदृष्ट्या पुढारलेले असेल परंतु आजही आमचा महाराष्ट्रातील शेतकरी भेंडवळच्या मांडणीवर अर्थात भविष्यवाणीवर पिढ्यानपिढ्या अवलंबून आहे.

याचा परिचय पाच दिवसांपूर्वी नेपाळमध्ये झालेल्या प्रचंड जलप्रदायाची घटना पाहता आला आहे. विशेष म्हणजे पावसाचा एकही थेंब पडलेला नसताना अचानक महापूर आला. त्यात 700 हून अधिक लोक दगावले, हजारो लोक बेपत्ता झाले. अनेक संसार उध्वस्त झाले.

नेपाळमधील आजही अनेक गावं जीवन मृत्यूशी संघर्ष करीत आहेत. याच दरम्यान आता एक वेगळी चर्चा होताना दिसत आहे. ती म्हणजे महाराष्ट्र राज्यातील बुलढाणा जिल्ह्यातील भेंडवळच्या भाकिताची. यंदा महापूर येण्याचं भाकीत भेंडवळच्या घटमांडणी वेळी वर्तवण्यात आलं होतं. त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे



## भेंडवळ आणि नेपाळचे कनेक्शन काय?

भेंडवळच्या घट मांडणी नंतर जगातील पूरस्थितीच भाकीत वर्तविण्यात आलं होतं. विशेष म्हणजे भेंडवळच्या घटावर ठेवलेली पुरी गायब झाली होती. पुरी हे पृथ्वीच प्रतीक मानलं जातं.पुरीच गायब झाल्याने पृथ्वीवर भविष्यात नैसर्गिक आपत्ती येणार असल्याचे या मांडणीतून सांगण्यात आलं होतं. नेपाळमध्ये जलप्रलय आला शेकडो लोक मेले, सर्वत्र हाहाकार उडाला. ही सर्वात मोठी नैसर्गिक आपत्ती असल्याचं सांगितलं जातं. विशेष म्हणजे पावसाचा एक थेंबही न पडता हा प्रचंड हाहाकार उडाला. त्यामुळे भेंडवळच्या भाकिताच नेपाळच्या नैसर्गिक आपत्तीशी कनेक्शन असल्याचे सांगितलं जात आहे.

## यंदा काय होतं भेंडवळच्या मांडणीचं भाकीत ?

भेंडवडला 20 एप्रिल 2026 रोजी मांडणी करण्यात आली होती. यावेळी देश आणि विदेशातील पाऊसमान, राजकीय परिस्थिती, आणि युद्ध, यावर भाष्य करण्यात आलं होतं. त्यानुसार काही घटना घडल्या आहेत. विशेष करून नेपाळचा प्रलय आल्याने भेंडवळच भाकीत खरं ठरल्याचे मानलं जात आहे.

## महाराष्ट्राबद्दल भेंडवळच भाकीत काय!

भेंडवळच्या मांडणीत महाराष्ट्रातील पावसाचे भाकीत करण्यात आलं होतं. आणि हे भाकीत खरं ठरत आहे. भेंडवळच्या भाकितानुसार जून मध्ये भरपूर पाऊस सांगितला होता. जुलैमध्ये सर्वसाधारण आणि ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात पावसाचा जोर कमी राहण्याचे भाकीत करण्यात आलं होतं. काही भागात महापूर येण्याचही भाकीत होतं. ते खर ठरल आहे. महाराष्ट्रात जून मध्ये काही ठिकाणी जोरदार, तर काही ठिकाणी नगण्य पाऊस झाला. जुलैमध्ये ही जेमतेम पाऊस झाला. ऑगस्टमध्ये पाऊस कमी पडला, आणि आता हवामान खात्याच्या अंदाजानुसार सप्टेंबर मध्ये पाऊस ओसरणार आहे.

# शहरात भूखंड हडपणाऱ्या टोळ्यांचा सुळसुळाट...!

प्रतिनिधी ३० ऑगस्ट




**अकोला:** बनावट कुलमुखत्यारपत्र व खोट्या दस्तऐवजांच्या आधारे सुमारे पाच कोटी रुपये बाजार मूल्य असलेल्या मलकापूर परिसरातील मोक्याच्या भूखंडाची विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने तीन मुख्य आरोपींना अटक केली असली, तरी अशा अनेक टोळ्या शहरात सक्रिय झाल्या आहेत. बेरोजगारांची टोळी जमवून, त्यांची दिशाभूल करून, त्यांना गाड्या घोड्या व व्यसनाचे आमिष दाखवीत स्वतः मात्र अलिप्त राहण्याचे धोरण स्वतःला मोठे दादा म्हणून घेणाऱ्या तथाकथित पैलवान आणि राजकीय पक्षांशी संबंधित असलेल्या पांढरपेशा लोकांची मोंडस ऑपरेडी शहरातच नव्हे तर जिल्ह्यात सुरू झाली आहे.

मयत झालेल्या तसेच प्रॉपर्टीवर वाद सुरू असलेल्या जागांवर टोळक्याचे लक्ष!

शहराची हद्द वाढ झाल्यानंतर जमिनींना सोन्याचे भाव आले आहेत. अशातच काही मोक्याच्या ठिकाणी असलेल्या शेती किंवा जागांवर या टोळकयांचे लक्ष लागले आहे. या टोळक्यांना पुढे करण्यासाठी शहरातील तथाकथित भूखंड माफिया सक्रिय झाले आहेत. त्या- त्या परिसरातील दादा आणि पैलवान लोकांना हाताशी धरून त्या जागेवर अतिक्रमण करणे, वेळप्रसंगी खोटे कागदपत्र सादर करून जागामालकांवर दबाव आणणे, प्रसंग पडल्यास मारहाण करणे, शक्ती प्रदर्शन करणे आदी प्रकारात वाढ झाली आहे. एखादा जर गरीब व्यक्ती असला तर तो बिचारा जागा जात आहे हे पाहून मिळेल ते पदरात घेऊन जागा या भूखंड माफियांच्या घशात घालत आहे. अशा टोळक्यांचा पोलिसांमध्ये रिपोर्ट दिल्यानंतरही काहीच कारवाई होत नसल्याने या टोळ्यांचे मनोधैर्य वाढतच चालले आहे. विशेषता सणांमध्ये आपल्या गँग मधील बेरोजगार अल्पवयीन मुलांना काही गोष्टीचे आमिष देणे हे दादा लोक सुरू ठेवतात. त्यामुळे या मुलांना वाटते की आपण काहीही केले तरी आपला पैलवान किंवा दादा आपल्या पाठीशी आहे. त्यामुळे ही अल्पवयीन मुले काहीही करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळे शहरात अशा अनेक टोळ्या निर्माण झाल्या आहेत. वृद्ध महिला व पुरुषांना हेरून त्यांचे भूखंड कशाप्रकारे लाटावे यासाठी या टोळ्या शहरात सक्रिय झाल्या आहेत. त्यांचा बिमोड करण्यासाठी पोलीस आणि प्रशासनाने पाऊले उचलणे गरजेचे झाले आहे.

# भेसळीच्या संशयावरुन दोन प्रतिष्ठानावर कारवाई

## १२ लाखाचा मुद्देमाल केला जप्त

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोला:** येथे अन्न व औषध प्रशासनाने सोयाबीन तेलात भेसळ असल्याच्या संशयावरून दोन प्रतिष्ठानवर कारवाई करून सुमारे १२ लाख रुपये किमतीचा माल जप्त केला. दोघांचे परवाने निलंबित केले आहे. 26 रोजी मे. प्रभुदयाळ लक्ष्मीनारायण एमआयडीसी अकोला या पेढीची तपासणी करून रिफाईन सोयाबीन तेल ( शक्ती) चा अन्न नमुना घेऊन उर्वरित साठा सुठे तेल विक्री, प्रयोगशाळा नसणे, प्रयोग शाळेचे अहवाल नसणे, पुनरवापर भेसळीच्या संश्यावरून, रिपॅकरची परवानगी असताना ट्रेडिंग करत होते व इतर त्रुटी असल्याने 3428.400 किलो किंमत रु. 6,21,300 जप्त केला. सदर कारवाई ही अन्न सुरक्षा अधिकारी श्री किशोर बोरचाटे यांनी केली आहे. तसेच, मे. भरतकुमार अँड ब्रदर्स एमआयडीसी अकोला या पेढीची तपासणी करून रिफाईन सोयाबीन तेल (सुटे) अन्न नमुना घेऊन उर्वरित साठा भेसळीच्या संशयावरून, प्रयोगशाळा अद्ययावत नसणे, सुटे तेल विक्री करणे, प्रयोगशाळेचे अहवाल नसणे व इतर त्रुटीच्या आधारे 3598.400 किलो किंमत रु. 5,61,350 जप्त केला. सदर कारवाई ही अन्न सुरक्षा अधिकारी रवींद्र सोळंके यांनी केली आहे. वरील दोन्ही पेढी ह्या रिपॅकर ऑईलसाठी परवाना धारक आहेत. दोन्ही पेढी मध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटीच्या आधारे दोन्ही पेढीचा परवाना पुढील आदेशापर्यंत तात्काळ निलंबित केला आहे.

वरील दोन्ही कारवाई आयुक्त तुकाराम मुंढे व सह आयुक्त सचिन केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे असे सहाय्यक आयुक्त देवानंद वीर यांनी सांगितले.



# अथर्व बाहेतीची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**अकोला:** येथे राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त राज्य विज्ञान संस्था नागपूर, शिक्षणाधिकारी कार्यालय व कुतुहल संस्कार केंद्र द्वारे नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. सात फेऱ्यांमध्ये झालेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत कोठारी कॉन्व्हेंटच्या दहावीचा विद्यार्थी अथर्व महेश बाहेती आणि साई भावनेर या दोघांच्या चमूने सर्वोच्च गुण प्राप्त करून प्रथम पारितोषिक प्राप्त केले. त्यांची अहमदाबाद येथील इस्रो सायन्स सेंटर आणि विक्रम साराभाई अणुविज्ञान केंद्र येथे अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली. त्यांना डॉ नितीन ओक आणि विज्ञान शिक्षक नरेश राठी यांचे तसेच त्याचे आई-वडील प्रा महेश आणि सौ जया बाहेती यांचे मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले.

# शिवणी शिवर परिसरातील उड्डाणपुलाच्या दुरुस्तीवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोला:** शिवणी शिवर परिसरात असलेल्या उड्डाणपुलाच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पुलाच्या प्लेट्समध्ये गॅप आणि प्लेट्स आऊट झाल्याची माहिती मिळाल्यानंतर दुरुस्तीचे काम करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या दुरुस्तीच्या पद्धतीमुळे पुलाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, उड्डाणपुलाच्या काही प्लेट्स आऊट झाल्या होत्या, तसेच प्लेट्समध्ये गॅप निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली. त्यानंतर ड्रिलिंग करून रॉड फिक्स करत दुरुस्तीचे काम करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, दुरुस्ती नेमक्या कोणत्या तांत्रिक पद्धतीने करण्यात आली? या कामासाठी कोणत्या मानकांचे पालन करण्यात आले? आणि कामाची गुणवत्ता तपासण्यात आली का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, पुलाचे साइड पिलरदेखील आऊट असल्याचे दृश्यातून दिसून येत आहे. त्यामुळे केवळ वरवरची डागडुजी करून पुलाची समस्या दूर होणार आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. उड्डाणपूल हा दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक आणि वाहनांचा भार सहन करतो. त्यामुळे अशा संरचनेच्या दुरुस्तीमध्ये कोणतीही हलगर्जीपणा किंवा तांत्रिक त्रुटी भविष्यात गंभीर ठरू शकते.त्यामुळे संबंधित विभागाने या दुरुस्तीच्या कामाची तांत्रिक तपासणी करून पुलाची सुरक्षितता स्पष्ट करावी आणि कामाची गुणवत्ता व खर्च याबाबत पारदर्शक माहिती नागरिकांसमोर ठेवावी, अशी मागणी होत आहे.

# गुटखा कारवाईनंतर 'दोन गटां'ची चर्चा

## बाहेरगावातून होणाऱ्या पुरवठ्यावर पोलिसांची नजर?

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहरात गोवा बनावटीचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा मोठा साठा जप्त केल्यानंतर आता या अवैध व्यवसायामागील सूत्रधार कोण, याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. गुटखा विक्रीच्या या कथित नेटवर्कमध्ये शहरातील एक गटातील 3 युवक आणि बाहेरगावाशी संबंधित दुसरा गट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, स्टेशन परिसरातील काही व्यावसायिक भागीदारांच्या माध्यमातून तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटख्याचा पुरवठा होत असल्याचा आरोप व संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या चर्चेची पोलिसांकडून सखोल चौकशी झाल्यास गुटख्याच्या पुरवठ्याची साखळी आणि त्यामागील व्यक्ती समोर येऊ शकतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अलीकडेच पोलिसांनी केलेल्या कारवाईत वाहनासह लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. या कारवाईत माहिती देणाऱ्या एका युवकाची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा आहे. संबंधित युवकाने पोलिसांना गुटख्याच्या साठ्याबाबत माहिती दिल्याचे बोलले जात असून, त्यानंतर तो पोलिसांचा माहितीदार म्हणून चर्चेत आला आहे. मात्र, या युवकाच्या भूमिकेबाबतही शहरात सध्या उलटसुलट चर्चा सुरू आहे. 'मोठा साठा सापडला, आता पुरवठ्याच्या मुळापर्यंत पोहोचणार का?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ साठा जप्त करण्यापुरती कारवाई न करता गुटखा कुठून आणला जातो, कोणाच्या माध्यमातून त्याचा पुरवठा होतो आणि तालुक्यातील विक्रीचे जाळे कोण चालविते, याचा तपास करण्याची मागणी आहे.

# उषाताई घुगे स्मृती राज्यस्तरीय काव्यस्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोला :** कालकथित उषाताई घुगे बहुद्देशीय संस्था आणि अंकुर साहित्य संघ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. मनोहर घुगे यांच्या भगिनी उषा घुगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय काव्यस्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी विषयाचे कोणतेही बंधन नसून, स्पर्धकांनी कोणत्याही विषयावरील आपली एक स्वरचित कविता पाठवायची आहे. मात्र, काव्यरचना कोणाच्याही भावना दुखावणारी नसावी.

# महाराष्ट्र कामगार कर्मचारी पतसंस्थेचा वार्षिक अहवाल सादर




प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**अकोला:** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ कर्मचारी पतसंस्था मर्या अकोला ची 27 वी वार्षिक आमसभा दिनांक 29/08/2026 रोजी ललित कला भवन डबकी रोड येथे संपन्न झाली आमसभेचे अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री प्रमोद घोडचर हे होते तर प्रमुख उपस्थिती सचिव सुरेंद्र शिरसाट कोषाध्यक्ष मोहन तायडे सदस्य सुभाष लहाने,मनीष सरदार,विनोद देशमुख,संचालिका सौ किरण भोगे,सौ ज्योती खत्री होत्या तर प्रमुख उपस्थिती सहाय्यक कल्याण आयुक्त नागपूर श्रीकांत धोत्रे,होते गुणवंत कामगार मावळे साहेब तसेच उपस्थिती श्री पंजाबराव देशमुख,कैलास बचे सहदेव ठाकरे होते प्रथम पाहुण्यांचे हस्ते दिप प्रज्वलन करून सरस्वतीतेचे पूजन करण्यात आले पाहुण्यांचा तथा संचालक मंडळ आणि माजी अध्यक्ष यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला नंतर गुणवंत कामगार पाल्याचा धनादेश, शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला अहवाल वाचन तथा सूत्रसंचालन संचालक विनोद देशमुख यांनी तर प्रास्ताविक अध्यक्ष प्रमोद घोडचर यांनी आणि विशेष मार्गदर्शन श्रीकांत धोत्रे तथा मावळे साहेब,पंजाबराव देशमुख व कैलास बचे यांनी केले तर मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष श्री सतीश दाभाडे,आणि सहाय्यक कल्याण आयुक्त सौ वैशाली नवघरे यांनी केले नंतर सर्व सभासद भोजन आणि लाभांशाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली तसेच अर्धवेळ कर्मचारी यांना कर्जपुरवठा 200000 करण्यास लवकरच मान्यता देण्याचे मान्य करण्यात आले अतिशय खेळीमेळीचे वातावरणात सभा संपन्न झाली

# सोमवारी मुंबईत विमुक्त दिना'निमित्त न्याय, हक्क आणि विकास परिषद

## मंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासाचा 'रोडमॅप' ठरणार

प्रतिनिधी ३० ऑगस्ट



**यवतमाळ** - अठरा पगड जातींना' समाजकारण आणि राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना मान-सन्मान मिळवून दिला. हीच दूरदृष्टी जपत शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देशभरातील भटके-विमुक्त (डीएनटी) समाजाला संघटित करून त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रवाहात भक्कमपणे उभे करण्याचा निश्चय केला. ही जबाबदारी त्यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यावर सोपवली. यातूनच भटके-विमुक्तांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प दृढ करत, मुंबईत सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी 'विमुक्त दिना'च्या निमित्ताने भटके – विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ब्रिटिश काळात १८७१ च्या 'क्रिमिनल ट्राइब्स अॅक्ट' नावाच्या जुलमी कायद्यामुळे अनेक भटके-विमुक्त जमातींवर गुन्हेगारीचा कलंक लादला गेला होता. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये हा कायदा रद्द होऊन ३१ ऑगस्ट रोजी हा समाज खऱ्या अर्थाने विमुक्त झाला. या ऐतिहासिक 'विमुक्त दिना'चे औचित्य साधून, अखिल भारतीय शिव भटके-विमुक्त (डीएनटी) सेनेच्या वतीने 'शिवसेना भटके-विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद – २०२६' चे आयोजन सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी मुंबई येथे श्री षण्मुखानंद सरस्वथी सभागृह, सायन येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य मार्गदर्शन लाभणार आहे. परिषदेचे आयोजक व भटके – विमुक्त (डीएनटी) समाजाचे राष्ट्रीय नेते, मंत्री संजय राठोड यांच्यासह राज्यभरातील शिवसेनेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, समाजातील उपेक्षित प्रश्नांवर प्रसिद्ध लेखक तथा डीएनटी अभ्यासक 'उपरा'कार लक्ष्मण माने, 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड, डीएनटी फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय संयोजक दिगंबर राठोड हे विचारवंत आणि अभ्यासक परिषदेत सखोल मार्गदर्शन करणार आहेत.



## संस्कृतीचा जागर: 'भटके-विमुक्त लोककला संगम'

हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेत महाराष्ट्रातील भटके-विमुक्त समाजाच्या पारंपरिक लोककला, दुर्मीळ वाद्ये आणि वेशभूषांचे थेट सादरीकरण होणार आहे. सुप्रसिद्ध लोककलावंत नंदेश उमप आणि त्यांचा संच 'भटके-विमुक्त लोककला संगम' हा सांस्कृतिक कार्यक्रम या सोहळ्यात सादर करणार आहेत. 'एकत्र येऊया... संघटित होऊया... हक्क, न्याय आणि विकासाची नवी दिशा घडवूया...' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला महाराष्ट्रातील सर्व भटके-विमुक्त समाजबांधव, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने मुंबईत होणाऱ्या या परिषदेस उपस्थित राहावे.

# जादू टोण्याच्या संशयातून वृद्ध महिलेची हत्या

प्रतिनिधी ३० ऑगस्ट

**धारणी:** मागील वर्षी चिखलदरा तालुक्यातील रेहट्याखेडा येथे जादूटोण्याच्या संशयातून एका वृद्ध महिलेची धिंड काढल्याच्या अमानुष घटनेला वर्ष पूर्ण होत नाही, तोच धारणी तालुक्यातील गोबरकहु येथे अंधश्रद्धेने पुन्हा एक जीव घेतला.जादूटोणा करत असल्याच्या संशयातून ५८ वर्षीय वृद्ध महिलेची गळा आवळून निघृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत खुनाचा उलगडा करीत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. समोती रामभाऊ कासदेकर असे मृत महिलेचे नाव असून, रामलाल लक्ष्मण कासदेकर याला अटक करण्यात आली आहे.राजू रामभाऊ कासदेकर यांच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदविला. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान गोबरकहु येथील शेतशिवारात समोती कासदेकर यांची हत्या करण्यात आली. त्यांच्या गळयातील चांदीच्या टोगली कड्याने गळा आवळून हे कृत्य करण्यात आले.घटनेनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरविली. गुप्त माहितीच्या आधारे २८ ऑगस्ट रोजी आरोपी गावालगतच्या शेतात लपून बसल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. मृत महिला जादूटोणा करते आणि त्यामुळे आपल्या कुटुंबाला त्रास होत असल्याच्या संशयातून हत्या केल्याचे तपासात समोर आले.



अंधश्रद्धेचा विळखा कायम एका बाजूला विज्ञानाच्या प्रगतीच्या गप्पा, तर दुसऱ्या बाजूला जादूटोण्याच्या संशयातून महिलांचे बळी-गोबरकहुच्या घटनेने समाजातील अंधश्रद्धेचा विळखा अद्याप किती घट्ट आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. रेहट्याखेड्यातील घटनेनंतरही मानसिकतेत बदल न झाल्याने हा प्रकार विशेष चिंताजनक ठरत आहे. अमानुष घटनेनंतरही मानसिकतेत बदल न झाल्याने हा प्रकार विशेष चिंताजनक ठरत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135